

# जोकोतीना

प्रकाश कार्येंकर

# जोकोतीना

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिटे

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

## असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची, हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# जोकोतीना

(कथासंग्रह)

लेखक

## प्रकाश कार्येकर

जोकोतीना (कथासंग्रह)

लेखक: प्रकाश कार्येकर

प्रकाश भालचंद्र कार्येकर

९०१ / ५, एकोलेड सोसायटी , लुईस वाडी, ठाणे ४००६०४

फोन - ९८१९८४७५६८

ईमेल: p_karyekar@yahoo.co.in

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity.in

www. esahity. com

esahity@gmail. com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

**प्रकाशन : २४ सप्टेंबर २०२०**



©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

जन्मदात्री आणि जगद्धात्री

ज्यांनी मला घडवले,

त्यांना

सादर अर्पण

# प्रस्तावना

लाखो प्रकाश वर्षे पसारा असलेल्या आकाशगंगा ज्यात हरवून जातात अशी कृष्ण विवरे आणि त्या कृष्ण विवराना समीकरणा मध्ये बांधणारे गणिती, जेव्हढे सूक्ष्म तेव्हढेच विराट, तरीही एकजीव.

आणि असे गणिती जेंव्हा म्हणतात "An equation for me has no meaning unless it represents a thought of God."
- तेंव्हा एक नवीन क्षितीज सामोरे येते.

त्याला साक्षी ठेऊन वेगळ्या वाटेने जाताना अचानक साता समुद्रापार एक आर्ष हाक कानी येते, तर कधी डोंगर माथ्यावर यक्षगान ऐकतो, कधी जंगलात हरवतो आणि इतिहासाला साक्षात बघतो, कधी जन अरण्यात मिसळून एक रुदाली अनुभवतो, कधी एका तुफानात सापडतो, कधी वाळवंटात मृगजळाच्या मागे धावतो, कधी गणिताच्या जादुई पोतडीतून अनवट चीजा बाहेर येतात आणि घेरून टाकतात. कधी त्या अनंत क्षितीजाच्याच पाठीमागे पळताना दमछाक होते आणि वाळूत अंग टाकून देतो. कधी तळ्यात दगड मारून भाकऱ्या पाडायचा मोह होतो. असे काही बाही बघत रमत गमत जाताना एकदम एखादे रौद्र, हृदयद्रावक दर्शन ही घडते.

सामान्य, सुजाण माणसाला, बुद्धीला पटतील पण कल्पना विश्वात रमवतील, कोड्यात टाकतील तसेच हसवतील अशा ह्या कथा आहेत.

यश अपयशाचे अंतिम अर्थ - अनर्थ, हिंसा - अहिंसा, मरणोत्तर विज्ञान, अध्यात्म, studies in consciousness, quantum physics, what is information in IT, गणिताचे तत्वज्ञान आणि तत्वज्ञानातील गणित, अवतार आणि singularity, राजकारण, व्यवस्थापन, श्रद्धा, मनाचे वास्तविक स्वरूप, - अशा कितीतरी गोष्टी, त्यांचा रुढार्थ आणि नवीन क्षितीज ह्याचा मेळ बसत नाही आणि आपण विचारात पडतो. हे नक्की काय आहे.

ह्या कथांचे कदाचित हेच यश असेल.

# ओळख



मी एक मध्यम वर्गीय, सामान्य माणूस आहे. मी अज्ञ आहे, तज्ञ नाही. सगळ्या विषयात रस-रुची-आवड-निवड-जाणीव असणारा, संवेदनशील सामान्य माणूस. सामान्य माणसाची दिवसाची सुरुवात वर्तमान पत्राने होते. माझी सुद्धा सकाळ चहा आणि वर्तमान पत्रानेच होत होती.

नंतर दूरदर्शनमुळे बातम्या जास्त रंगीत, आकर्षक झाल्या. तेव्हढ्याच त्या सवंग, बाजारू झाल्या. सत्तेच्या आधीन झाल्या. सत्तेचे आणि स्वतःचे हित जपणाऱ्या झाल्या.

तेंव्हा नुकतेच संगणक युगाची, इंटरनेटची, सुरुवात झाली होती. त्यावर बातम्या बघण्याचा, माहिती शोधण्याचा, एक विरंगुळा मिळाला. जसजसे प्रत्येक बातमीचा स्त्रोत, त्यावर चारी बाजूने मिळणारी माहिती आणि विश्लेषण - ह्यांचा ओघ वाढला, तसतसे भारतीय प्रसार माध्यमाची विश्वसनीयता कमी होत गेली. शून्यवत झाली. सामाजिक माध्यमाची गरज जाणवू लागली. आता रोजचे सकाळचे वर्तमान पत्र चिडवणारे, चीड आणणारे, खोटे, अपूर्ण, एकांगी आणि दुष्ट वाटू लागले.

आणखी एक स्पष्टपणे कळले, हिंदू जन मानसाची मोठ्या प्रमाणावर घुसमट होत आहे. जाणीवपूर्वक केली जात आहे. प्रसार माध्यमे, सत्ताधीश आणि त्यांचे बुद्धिवादी हस्तक, त्यांनी पेरलेले आणि वेचलेले साहित्यिक, त्यांनीच नेमलेले अधिकारी - सगळे मिळून हिंदू माणसाला आणि त्याच्या प्रिय संस्कृतीला घेरून, मिळेल त्या विषयावर बदनाम करता आहेत. हिंदू माणसाला बोलता येत नाही, सहन होत नाही, विरोध करणे दूरच राहिले. अशी परिस्थिती निर्माण केली गेली. अशा वेळी सत्याचा आधार मिळाला तो सामाजिक माध्यमातून.

आपल्या स्वातंत्र्यावर हा उघड हल्ला आहे आणि लोकांना त्याची पुसटशी सुद्धा जाणीव नाही, ह्यामुळे जास्त वाईट वाटले.

मनाचा हा एकलकोंडा, अगतिक प्रवास गेल्या दोन दशकांचा आहे. तो उथळ आणि तात्पुरता नाही. भारतीय स्वातंत्र्य आणि लोकशाही ह्यांचा चौथा आधारस्तंभ मानला गेलेला प्रसार माध्यम व्यवसाय फक्त स्वार्थ आणि फायद्यासाठी काम करतो, त्यासाठी देशाच्या हिताचा बळी देतो, ही वेदना खोल आणि तीव्र आहे.

त्या मनाच्या स्थितीत 'पहाटेपूर्वीचा काळोख - एक अरण्य रुदन' आणि 'जोकोतीना - स्वातंत्र्य समर तिसरे' लिहिले गेले. लिहिल्यामुळे मनात कोंडलेल्या विचारांना वाट मिळाली. आणि मग असच काही

बाही लिहित राहिलो. जोकोतीना म्हणजे भविष्यात घडाव्या अशा अनेकविध घटनांची - दिवास्वप्नाची, सूचक नांदी होती.

मी इतिहास लेखक किंवा इतिहासाचा अभ्यासक नाही. विचारवंत / तत्वज्ञ मुळीच नाही. साहित्यिक नाही. साहित्याचा अभ्यासक नाही. मी खूप काही वाचले आहे, असा माझा दावा नाही. मला कळते, समजते असा माझा अभिनिवेश नाही.

सामान्य, सुशिक्षित, सुजाण माणसाला जे दुखते, खुपते, पटते, ओढ लावते, अस्वस्थ करते, किंवा ज्याची टिंगल करावी असे वाटते, ते ते मी निस्वार्थ, निरागसतेने, हक्काने केले आहे. वाचकांनी ते मानून घ्यावे, समजून घ्यावे ही एकच विनंती.

बहुतेक कथा ह्या काल्पनिक चित्रावली (Fantasy) प्रकारात मोडतात. त्यात भारतीय अध्यात्मिक विचार गृहीत आहेत. तसेच आजचे आघाडीचे विज्ञान सुद्धा गृहीत आहे. रामानुजन सारखा महान गणिती असे म्हणतो "An equation for me has no meaning unless it represents a thought of God." तशी गणित आणि श्रद्धा हि सुद्धा ह्या कथांची पार्श्वभूमी आहे.

खरे तर हे सगळे स्वान्तः सुखाय असेच होते. पण मग वाटले ALL THAT IS NOT SHARED IS LOST. ह्या भीतीतून हा लिहून ठेवण्याचा आणि प्रकाशनाचा प्रपंच घडला.

प्रकाश कार्येकर (०७-०७-२०१८)

## कथानुक्रम

१७२९

चंदेरीचा टेहेळकरी

जोकोतीना

दगड

सुर्याची चांदणी

या कथासंग्रहातील सर्व कथा काल्पनिक आहेत. त्यांतील व्यक्ती, स्थळ, प्रसंग हे सर्व काल्पनिक असून वास्तवातील कोणा व्यक्ती वा स्थळाशी त्यांचे साम्य आढळून आल्यास तो निव्वळ योगायोग ठरेल.

# १७२९

*( एकदा एक आडमुठी संख्या एका गणितीला भेटली आणि म्हणाली, माझे काहीतरी कर. तेंव्हा त्याने तिला आपल्या वहीत जपून ठेवले. १०० वर्षांनी वही उघडली तर त्या संख्येतून असंख्य, अनवट, बहारदार चीजा बाहेर पडू लागल्या. मग जगातल्या सर्व गणितिनी टाळ्यांच्या कडकडाटात तिचे स्वागत केले.*

*तिच्यामुळे माझी गणितातील 'अनंत' ह्या संकल्पनेशी जिवंत ओळख झाली, जणू परिघाला मध्य बिंदूची भेट झाली, हे घडले कसे त्याची हि गोष्ट.*

*ही गोष्ट एक थोर भक्त आणि महान गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन ह्यांना समर्पित आहे. )*

---

मी मुळचा वळवण गावचा. लोणावळ्याहून ढाक कडे जाताना राजमाचीचा फाटा गेला की थोडे पुढे डावीकडे वळवण चा फाटा लागतो. मी, आई आणि किसन ; बाबा लहानपणीच गेले, आईनेच वाढवले. आमची झोपडे गावच्या जरा पलीकडे, दुधवाल्यांच्या वाटेपाशी होती. म्हणजे अजूनही आहे, फक्त आम्ही पुण्याला राहतो आता. आम्ही म्हणजे मी आणि माझे कुटुंब. आई काही वर्षापूर्वी वारली. किसन मुळेच माझी आणि आईची शेवटची भेट होऊ शकली. आईच्या मृत्यू नंतर किसन गावाला जातो म्हणून गेला तो परत आलाच नाही. किसनची आणि माझी सुद्धा तीच शेवटची भेट. आता तो कोठे असतो हे माहित नाही, कधी, कोठे, कसा भेटेल एक देवालाच ठाऊक.

त्याची माझी पहिली भेट मला आठवतच नाही. माझ्या लहानपणापासून तो आमच्या घरी येतो, जातो, जेवतो - खातो, राहतो. मला तर वाटायचे माझा मामा आहे. आईला सरपण गोळा करून देईल, शेणाच्या गोवऱ्या करून देईल, होळीला लाकडे फोडून देईल, कधी दिवाळीला आंगण सारवून देईल. तो आला कि आईला असे होत असे की ह्याला कोठे ठेऊ आणि कोठे नको, आणि किती किती कामे साचलेली असायची. त्याला पण आईच्या हातचे थालीपीठ, पुरण पोळी फार आवडायची. फक्त तो कधी येईल त्याचा नेम नसायचा. त्याचा खर तर काहीच ठाव-ठिकाणा नव्हता. त्याला बोलवायला कोठे जायचे हा एक प्रश्नच होता. आमचे घर सोडले तर दुसऱ्या कुणाकडेही तो कसलेही काम करायचा नाही. गावातही तो नसायचा. आईने सांगितले म्हणून, नाहीतर गावाला तो माहीतही नव्हता.

मी त्याला किसन मामा म्हणून हाक मारत असे. माझी चवथी संपली आणि माझे नाव कोणत्या हायस्कुलात घालायचे असा प्रश्न पडला होता आईला. मला लोणावाल्यातल्या शाळेत जायचे होते, कारण माझे सगळे दोस्त तिकडे होते. पण लोणावळयात आमचे कोणीच नव्हते. रोज पायी दीड तास जायला आणि दीड तास यायला लागणार. परत वाटेत, राजमाचीच्या वळणापाशी, दोन कोस घनदाट जंगल. जंगल संपले की लगेच मोठा, आड-दांड ओढा. ओढ्याला पाण्याची प्रचंड ओढ. पाय सरकला तर संधीच नाही. शंभर पावलेच पुढे, कडा. कड्यावरून खोल, खाली उडी घेणारा धबधबा. शिवाय

पाउस पाणी, उन्हाळा, थंडी, कडाक्याचे. सगळे मला निभावून नेता येईल का ? म्हणून आईला मला कर्जतच्या मामाकडे पाठवायचे होते. पण मी हट्ट धरून बसलो. मला आठवते, आईच्या डोळ्याला पाण्याची धार लागली होती. मामा येऊन समजावून गेला. पण मी लोणावळ्याचा हट्ट काही केल्या सोडेना.

तेव्हा अगदी सकाळी सकाळी किसन आला. आई चुलीपाशी भाकरी करत होती. मी बाहेर अंगणात कैऱ्या मोजत होतो. थोड्या वेळाने आई खुशीत बाहेर आली.

'परशा, माझी काळजी मिटली, तूला लोणावळ्याला जायचे ना, जा. आता रोज हा किसन मामा तुला सांभाळून नेत जाईल आणि आणत जाईल. पण लक्षात ठेव, मामाचे ऐकायचे. मामाला त्रास द्यायचा नाही.'

तेंव्हापासून किसनची आणि माझी दोस्ती पक्की झाली. त्याच्या मुळेच मला लोणावळ्याला माझ्या मित्रांच्या बरोबर शिक्षण घेता आले.

**********

किसन गव्हाळ वर्णाचा, अतिशय काटक, उंच, उमदा आणि नेहमी हसतमुख असा होता. तो खूप शक्तिमान होता. कमी, जरुरीपुरतेच बोलत असे, बोलण्यात गोडवा आणि ठामपणा असे. वय जास्त नसेल, माझ्यापेक्षा ५-१० वर्षे पुढे, जेमतेम शिकलेला, सही तरी करता येत

होती कि नाही कोणास ठाऊक. कामाचा उरक दांडगा, कामाचा उत्साहही दांडगा. आईला तो ताई म्हणायचा. भाऊ बिजेला न चुकता ओवाळणी म्हणून आई साठी साडी, माझ्यासाठी कापड आणि खाऊ आणायचा.

त्याला त्याच्या स्वतः बद्दल काही विचारले तर टाळायचा, विषय बदलायचा. एकदा मी आणि आई माझ्यासाठी मुलगी बघायला जाणार होतो, आई ने आग्रह केला त्याला 'चल म्हणून', आला. तेंव्हा सहजच मुलीकडच्यांनी विचारले, तर त्याने मुलाचा मामा अशी ओळख सांगितली. तेंव्हा त्यांनी विचारले, मामी कोठे आहे, तर म्हणाला मामी गावाकडे असते, पंढरपूरला. आम्ही घरी आल्यावर आईने त्याच्यापाशी खूप खोदून खोदून चौकशी केली, पण एव्हढेच बोलला, मी अनाथ, देवळात वाढलो, मला तुमची सारखे चांगली माणसे भेटतात, आणखी काय पाहिजे. आई रागावली, पण आईचा राग म्हणजे अळवावरचे पाणी, नवरात्र आले, तेंव्हा आईने आठवणीने एक सुंदर साडी आणली त्यच्या बायकोसाठी आणि त्याला दिली, त्याने न बोलता, थरथरत्या हाताने आणि पाणावलेल्या डोळयाने, ती घेतली. पण तो विषय कधीच वाढवला नाही. आई म्हणायची, असते प्रत्येकाचे एकेक दुःख. माझ्या लग्नात पण आईने त्याच्या बायकोसाठी सुंदर जरीची साडी आणि त्याच्यासाठी चागला साज पोशाख घेतला. त्याने तो आवडीने घातला आणि सर्वत्र मिरवला. तो अगदी साधा भोळा, भाबडा, अनाडी, होता. माझा जिवलग मित्र, सखा, पाठीराखा.

संपूर्ण जगात त्याच्या अशा फक्त तीनच गोष्टी होत्या. त्याची घुंगरे लावलेली काठी, त्याची घोंगडी आणि त्याचे मुंडासे. ते मुंडासे चांगले लांब लचक होते, आणि तो ते प्रसंगानुरूप निरनिराळ्या घाटणी ने बांधायचा. आणि त्या बरोबर त्याचे व्यक्तिमत्व सुद्धा एक कलाटणी घेऊन बदलत असे.

तो आणि मी शाळेत बरोबर जायचो, ओढा ओलांडून राजमाचीच्या रस्त्यापर्यंत तो मला रोज सोबत करायचा. त्याच्या बरोबर रस्ता आणि वेळ कसा संपून जाई कळत नसे. कधी कधी घुंगराच्या तालावर तो काहीबाही गात असे, ती बोली जरा वेगळी होती, पण गोड, सुरेल होती. त्याचे गाणे हे आमच्या तिघांचे गुपित होते. जरा कोण्या तिसऱ्या ची चाहूल लागली तरी तो सटकन गप्प, चिडीचुप्प व्हायचा.

घरी येताना तो माझ्या वाटेकडे डोळे लावून बसायचा, मी दिसलो कि आनंदाने हळी द्यायचा, मग आम्ही रमत गमत घरी निघायचो. मी शाळेत घडलेली प्रत्येक बारीक सारीक गोष्ट त्याला ऐकवत असे आणि तो मोठ्या उत्सुकतेने प्रश्न विचारात असे, त्याचे मत मांडत असे, माझ्या कविता ऐकत असे, त्याला शिकता आले नाही ना, म्हणून सारे काही पटापट आत्मसात करत असे. माझ्या आधी त्याच्या कविता पाठ व्हायच्या. परीक्षेच्या दिवशी किसन माझी तोंडी उजळणी घेत असे, इतिहासातील सनावळी, भूगोलातील तपशील आणि मराठी कविता त्याच्या चांगल्या लक्षात राहत असत. त्याची स्मरण शक्ती तीव्र होती

आणि बुद्धी चौकस होती, पण शिकायचा कंटाळा इतका होता कि आयुष्यात कधी पाटी हातात धरली नाही.

घरी गेलो कि हेच उलटे होत असे, मला सगळे त्याचे ऐकावे लागे. आईच्या मायेने तो हुकुम सोडत असे, हात पाय धु, कपडे बदल, पानात वाढलेले टाकायचे नाही. तो आईला सगळी मदत करत असे, लाकडे फोडणे, उंचीवरचे शिंकाळ खाली काढणे, भांडी धुणे, अंगण सारवणे, घराच्या भिंती शेणाने लिंपणे, कुंपणाची डाग दुरुस्ती करणे. एक का अनेक कामे तो हातावेगळी करत असे. त्याला आईचे जेवण फार आवडे. पण आश्चर्य म्हणजे, तो गावात दुसरी कामे घेत नसे, त्याचे कोणाशीही पटत नसे. पण म्हणून तो त्यांच्याशी संबंधच ठेवत नसे, बोलत नसे, ओळख सुद्धा दाखवत नसे, गावात तो वाऱ्याला सुद्धा थांबत नसे, त्यांना तो माहीतच नव्हता. आई ने कधी त्याला टोकले तरी त्याने दुसऱ्या कोणाचेही, कसलेही, काम, कधीही, केले नाही. त्याच्या मनाविरुद्ध एखादी गोष्ट करताना मी त्याला कधीही बघितले नाही. पोटासाठी, किवा चार पैसे मिळवावे, काही वस्तू जरूर आहे, म्हणून त्याने कधीही, काहीही केले नाही. आई त्याला दर वर्षी नवीन कपडे, पायताण आणि छत्री घेऊन देत असे. त्यात पहिल्यांदा खंड पडला तो आई गेली तेंव्हा. मी चैत्र पाडव्याला चेन्नई ला गेलो होतो आणि आल्यावर घरी गेलो तेंव्हा तो भेटला नाही. त्यानंतर मी दर वर्षी ह्या सगळ्या वस्तू घेऊन गावी गेलो, पण तो एकदाही भेटला नाही. पण मी जिद्द सोडली नाही. दर वर्षी त्याच्या नावाने त्या वस्तू जमा करत राहिलो

आणि त्या सगळ्या माळ्यावर अजूनही पडून आहेत. मी असा सोडणार नाही त्याला.

**********

तो गुरुवार होता. मी एका चर्चा सत्राच्या कारणाने दिल्लीला होतो. माझ्या भाषणाच्या मध्ये मला किसन चा लागोपाठ ३ वेळा फोन आला. माझ्या सहाय्यकाला भाषण वाचून दाखवायला सांगितले आणि मी मागे जाऊन फोन घेतला.

"परशा, असशील तसा घरी निघून ये, आई ची प्रकृती ढासळती आहे, तुझा ध्यास घेतला आहे, तुझ्या वाटेकडे डोळे लावून आहे. मी तुला लोणावळ्याला घ्यायला येतो."

मला वाटले जणू, माझ्या पायाखालची जमीन हरवती आहे, पोटात मोठा खड्डा पडला, आई, सदा सर्व काळ माझ्यावर सावली धरणारी, माझी आई.

लोणावळ्याला किसन माझी वाटच पाहत होता. काही न बोलता आम्ही वळवण ची वाट धरली. आठवणीनी ऊर भरून आला, "असे कसे, काय झाले आईला ?" हाच प्रश्न मनात सारखा येत राहिला. आता आता कोठे सुखाची जराशी चाहूल लागली, तर आई आजारी पडली. ती वाट चालताना जणू सगळा भूत काळ जागा झाला.

किसन काही बोलत नव्हता.

**********

लोणावळ्याला शाळेत पहिल्या दिवशी मला पाहून सगळे मित्र आश्चर्य चकित झाले. त्यांना वाटले होते कि मी बहुतेक शाळेला रामराम ठोकणार आणि कर्जतला कोठे तरी दुकानात पुड्या बांधत बसणार. त्यात परत मी वळवण हून चालत आलो हे कळल्यावर तर त्यांची बोलतीच बंद झाली.

शाळेचा प्रवास किसन च्या संगतीत मजेत झाला आणि लक्षणीय ठरला. चिंचा, बोरे, करवंदे, जांभळे, जांब भरपूर खाल्ले. धबधब्याखाली बसून आंघोळी केल्या. खेकड्यांचा पाठलाग केला. पावसाळ्यात चिखलाची वाट तुडवताना बाजूला काजव्यांचे थवे बघत वाट कधी संपली ते कळत नसे. वाटेतल्या उतारावरची कारवी फुललेली पहिली आहे मी.

आठ दहा दिवसातून एकदा, आम्ही लाकूड फाटा गोळा करून घरी घेऊन जात असू. एकदा आम्ही असेच काटक्या गोळा करून मोळी बांधून निघत होतो, तेव्हढ्यात वासराच्या हम्बरण्याचा आवाज ऐकला. एक सारखे, सतत, केविलवाणे हम्बरणे ऐकून किसन म्हणाला, बहुतेक वाट चुकले आणि संकटात असावे. चल, बघू या. आम्ही आवाजाच्या दिशेने जाऊ लागलो. बाभळी आणि करवंदाच्या जाळ्यांमधून वाट काढताना फार कष्ट पडले. उतार तीव्र झाला. उतरता, उतरता एकदम एका मोठ्या पाषाणावर पोहोचलो, रान अचानक मोकळे झाले, कारण

पलीकडे वीस पंचवीस हात खोल खड्डा होता. आणि ते वासरू खड्ड्यात खाली बाभळीच्या झाडावर पडलेले दिसले. घसरून पडले असावे. बाभळीच्या काट्यांनी रक्तबंबाळ झाले होते. त्याला बाभळीच्या जाळीतून बाहेर काढणे आणि घसरत्या उतारावरून वर घेऊन येणे खूप कठीण होते. पण किसन आजीबात डगमगला नाही. शांतपणे आणि निर्धाराने तो खाली उतरला, बाभळीच्या फांद्या एकेक करत बाजूला केल्या. वासराला एका हिसक्यात उचलले आणि खांद्यावर घेतले. आणि थोड्या दूरवरून, घसरणीची जागा सोडून, वर आला. वरती मी त्याची किती किती वाट बघितली, रात्र झाली, चंद्र वर आला. मी अगदी रडकुंडीला आलो होतो. तेव्हढ्यात किसन दिसला आणि मी धावत जाऊन त्याला बिलगलो.

आम्ही घरी निघालो. जसे रोजच्या वाटेला लागलो, तसे मला एकदम नवीन हुरूप आला, उत्साह आला. वासराकडे बघता बघता मी त्याच्याशी बोलायला लागलो. आईला कसे चकित करायचे, गोंधळून टाकायचे ह्या विचारात मी पूर्ण विसरलो, किसनला सुद्धा खूप खरचटले होते, तोही रक्तबंबाळ झाला होता.

घरी गेल्यावर आईने दोघांच्या जखमा धुतल्या, पुसल्या, हळद लावली. खायला दिले.

त्या दिवशी किसन माझा Hero झाला. त्याच्या अचाट शक्तीची मला ओळख पटली.

अशा रीतीने आमच्या घरात कपिलेचा प्रवेश झाला.

***********

मी, आई, किसन आणि आता कपिला.

कपिलेच्या रूपाने आईला एक आणखी हक्काचे प्रेम करणारे, करून घेणारे मिळाले. मी शाळेत गेल्यावर, कोणाशी तरी बोलण्यासाठी, दुखले खुपले सांगण्यासाठी, माया लावण्यासाठी आईला कोणीतरी मिळाले आणि ती भरून तृप्त झाली.

नंतर कपिलेच्या दुधाच्या विक्रीतून आईला घर खर्चासाठी हातभार होऊ लागला.

माझे ही सगळे कसे छान सुरळीत चालले होते. मी नववीत प्रथम क्रमांकाने प्रवेश केला. मी शिक्षकांचा लाडका होतो. class चा monitor झालो. मित्रांचा प्रिय आणि विश्वासू मित्र बनलो. मी मोठा झालो आणि मला त्याची जाणीव होत होती. पण आई काय किंवा किसन काय, मला अजून लहानच समजत होते.

त्याचे काय झाले, एका दिवशी मी आईला तेच समजावून सांगत होतो, मी आता मोठा झालो आहे, माझा मी एकटा शाळेत जाईन. माझे मित्र मला आणि किसनला एकत्र बघून हसतात. चिडवतात. पण ती ऐकूनच घेत नव्हती. तसे मी हट्टच धरला. रुसलो. रागावलो. आणि शेवटी बोलून गेलो, मला शाळेतच जायचे नाही, घरीच बसतो. तशी आई चिंतेत पडली, दुखावली, मला जवळ घेऊन बसली. डोळ्याला

धार लागली तिच्या. मी सुद्धा कसनुसा गरीब बापुडा होऊन कोपऱ्यात पुस्तक उलटे घेऊन बसलो.

जरा वेळाने किसन आला, ताई भूक लागली. हे काय, आज अजून चूल पण नाही पेटली. आईने माझी सगळी रामकथा त्याला ऐकवली. त्यावर तो म्हणाला, एव्हढेच. मी परशाच्या बरोबर जाणार नाही. मी त्याच्या पाठीमागून जाईन आणि लक्ष ठेवीन.

हा तोडगा आम्हाला दोघानाही पसंत होता.

त्या दिवसापासून मी स्वतंत्रपणे शाळेत जाऊ, येऊ लागलो. किसन पाठीमागे नक्कीच होता, पण माझ्या नकळत, मला न दिसता. मग मलाच कधी कधी कंटाळा यायचा, मी त्याला हाक मारत असे. लगेच तो रानातून, नाहीतर दूरवरच्या झोपडीतून, नाहीतर पाठीमागून ओढ्यातून येत असे, आणि मला चिडवत असे.

तिमाहीची परीक्षा होती. तीन दिवस पाऊस सतत पडत होता. एकदाही सूर्य दर्शन झाले नाही. पण मला तर जाणे भाग होते. आई काळजीत पडली होती. ती माजघरात होती, ती संधी साधून, तिला न सांगताच मी पटकन बाहेर पडलो आणि शाळेला निघालो. ओढ्यापाशी आलो आणि त्याचे ते उग्र रूप पाहून थोडा घाबरलो. आज पाण्याला ओढ प्रचंड होती आणि वरतून जणू पाणलोट होत होता. मनाची चल बिचल झाली. पण माझे शब्द मला अस्वस्थ करत होते. माझ्या फुशारक्या, माझ्या बढाया मला डिवचत होत्या. वाट

रोजची, पायाखालची होती. मी पाण्यात पाउल टाकले. निम्मा ओढा पार केला. पुढच्याच पाउलाला खाली खड्डा लागला. दप्तर सावरायच्या नादात चप्पल सरकली. पाय डगमगले. मध्यात पाण्याची ओढ जास्तच जाणवत होती. एका जागी सरळ उभे राहायला अवघड झाले. पुढे जाता येईना, पाठी फिरता येईना. पाण्यावर नजर ठरेना. गरगरायला लागले. आता वाटले वाहून जाणार. धबधब्या बरोबर कड्यावरून खाली पडून मरणार. जीवाच्या आकांताने किसनला हाक मारली. डोळयाच्या कोपऱ्यात किसन चे मुंडासे दिसल्याचा भास झाला. एका क्षणात त्याचा आवाज आला, परशा ते बघ समोर मुंडासे फेकले आहे, ते घट्ट पकड. मी ते पकडले, तोपर्यंत माझे पाय सुटले होते आणि मी पाण्यात आडवा झालो. मी पाण्याबरोबर ओढला जात होतो. पण दुसऱ्या बाजूने किसन ने मला खेचले. पुढच्या क्षणात किसन माझ्या जवळ आला, त्याने माझा हात धरला, मला चक्क उचलून खांद्यावर घेतले आणि पाण्यात एकेक पाय घट्ट रोवत त्याने ओढा पार केला.

ओढ्याकडे वळून बघवत नव्हते, एका क्षणापूर्वी च्या नाट्यामुळे तिथे जणू मूर्तिमंत भीती उभी होती. अजून पाय थर थर कापत होते. दातखीळ बसली.

आम्ही दोघे निःशब्द वाट चालू लागलो. मी त्याचा हात घट्ट धरून ठेवला होता तो तसाच राहू दिला. सडकेला लागलो तसे भानावर आलो. पण मनावर जणू भीतीचे सावट पसरले होते. किसन च्या

स्पर्शात मला मी कधीच न पाहिलेल्या वडिलांची मायेची आणि सुरक्षेची ऊब जाणवली.

आज गणिताचा पेपर होता. मास्तरांनी नुकतेच शिकवलेल्या Geomatry तील tangent ची आठवण झाली आणि मला हसू आले. ते बघून किसन ला आश्चर्य वाटले. मी म्हणालो, आज tangent म्हणजे काय ते प्रत्यक्ष अनुभवले. फक्त हि tangent भीतीची होती.

गणिताचा पेपर चांगला गेला.

एक चप्पल वाहून गेली, म्हणून दुसरी फेकून दिली. शाळेतून बाहेर पडताना त्याचे दुःख मोठे होते. पण किसन, कसे कोणास ठाऊक, नवी चप्पल लोणावळ्याहून खरेदी करून घेऊन आला होता. माझ्यासाठी. तेंव्हा मात्र माझा बांध कोसळला आणि मी त्याच्या जवळ हमसा हमशी रडलो. माझे मित्र बघतात, मास्तर पण पलीकडे उभे आहेत, ह्यातले काही काही मला दिसत नव्हते.

**************

दहावीला मी संपूर्ण जिल्ह्यात पहिला आणि बोर्डात सोळावा आलो. माझे शिक्षक, माझी शाळा आणि माझी आई - आमचा सत्कार झाला. आई इतकी आनंदात होती आणि तिला आनंदी बघून मला माझाच खूप अभिमान वाटला. आयुष्यात पहिल्यांदा मी आईला काहीतरी देऊ शकलो, दिले. आमच्या आनंदात किसन आणि कपिला ह्यांना सुद्धा आईने सहभागी करून घेतले.

पदवी शिक्षणासाठी मला पुण्याला वसतिगृहात ठेवायला आईने परवानगी दिली. पण जायला निघालो तेंव्हा ती फार रडली, मला किती वेळ जवळ घेऊन, नुसती मला बघत होती. मलाही अश्रू आवरले नाहीत. किसन माझी ट्रंक घेऊन मला वसतीगृहापर्यंत सोडायला आला.

पहिले वर्ष मी दर रविवारी घरी आईला भेटायला जात होतो. पण हळू हळू मी माझ्या अभ्यासात, कोलेजच्या वातावरणात, पुण्याच्या बहुविध कार्यक्रमात अडकलो, गुरफटलो आणि रमलो. तरी मी दोन तीन महिन्यातून एकदा घरी आईला भेटून येत असे. किसन ची भेट कधी होई, कधी होत नसे. किसन आईला सांभाळत असे.

आईने आता जपमाळ धरली. ती शेवट पर्यंत तिच्या हातात होती. अखंड जप आणि नाम स्मरण ह्या शिवाय तिला दुसरा कशाचाच आधार वाटला नाही. पण ती अतिशय आनंदात होती. माझी तपशिलात चौकशी करायची. सणाला माझ्यासाठी किसन च्या हाती गोड शिरा पाठवायची. मला तिच्यातला बदल जाणवला पण उमगला नाही. ते माझे वय नव्हते.

पण घारीसारखी ती माझ्यावर दुरून बारीक लक्ष ठेवून होती.

*************

अस्मादिक आता कोलेजात प्रसिद्ध झाले होते. आपल्या हुशारीने आणि मेहनतीने मी माझी जागा बनवली होती.

शिक्षणाचा खर्च तर नाहीच, उलट चांगली शिष्यवृत्ती मिळाल्याने मी थोडासा स्वतंत्र होऊ शकलो. माझ्या आवडी निवडीचा बोजा आईवर पडला नाही. अशा वेळी जे व्हायचे तेच झाले. मी मित्रांबरोबर जरा जास्तच वाहत जाऊ लागलो.

वसतिगृहाचा गणपती विसर्जन करून आम्ही खोलीवर आलो. एकाने गुपचूप बाटली काढली आणि बाकीच्यांनी सिगारेटी, पेले आणि खाणे जमवले. cheers म्हणून त्यांनी सुरुवात केली. तेंव्हा मला बघून ते हसले आणि कोणीतरी उपहासाने म्हणाले, अरे, त्याला नका विचारू, तो पुस्तकी किडा आहे, त्याला झेपायचे नाही.

ते ऐकून माझ्या तर डोक्यात तिडीक गेली आणि तिरीमिरीत मी ओरडलो, मला challenge करायचे नाही. भर रे माझा पेला. मी मित्राच्या समोर पडलेल्या पाकिटातून सिगारेट उचलली आणि पेटवली.

पहिला अनुभव घाबरवण्या इतका वाईट नव्हता. मी त्यांच्या मध्ये अधून मधून जाऊ लागलो आणि मला त्यात काही चुकते आहे असे नाही वाटले. मी आयुष्याचा उपभोग घेत होतो. मग पैसे शिल्लक न पडता, कमी पडू लागले. मित्रांना नाही म्हणण्याची भीड चेपली नाही. ३१ डिसेंबर च्या पार्टी साठी मी आईचा आग्रह डावलून पुण्याला परत गेलो. हॉटेल मध्ये पार्टी रंगात आली होती. 555 आणि whiskey बरोबर non-veg च्या वेगवेगळ्या dishes serve होत होत्या. मी खूप

enjoy केली पार्टी. मला चांगलीच चढली होती. मी तरंगत तरंगत खोलीवर आलो.

खोलीत पाउल टाकले. समोर माझ्या खुर्चीवर किसन बसलेला होता. त्याला सर्व प्रकार कळला असावा.

मला बघताच किसन उठला, खाडकन माझ्या थोबाडीत मारली. माझा हात पकडला आणि मला घेऊन निघाला. एक शब्द नाही. मी त्याच्यावर आरडा ओरड केली, रडलो, रागावलो, खूप आग - पाखड केली, पण त्याचा एक शब्द नाही. माझ्या हातावरची पकड ढिली केली नाही आणि सगळ्या मित्रांच्या समोरून मला ओढत घेऊन निघाला.

आम्ही घराच्या वाटेला लागलो. लोणावळा मागे पडले. जसजसे घर जवळ येऊ लागले, तसे तो दुःखी कष्टी होऊन अस्पष्ट रडू लागला. त्याला अश्रू आवरत नव्हते.

मला सगळे जाणवले. त्या प्रवासात आम्हा दोघांच्यात काहीतरी मनोमन - अतर्क्य, गूढ आणि खोलवर काहीतरी घडले. मला उमगले, तो त्याच्या ताईसाठी रडत होता. मला हेही उमगले, माझे आयुष्य इतक्या सोप्या, सरळ आणि सध्या गोष्टींसाठी नाही.

गावात शिरायच्या आधी मी त्याला थांबवले, मी परत असे काही करणार नाही, आईला काही सांगू नको.

ठीक आहे, मग तुझे तूच कबुल कर.

सकाळी सकाळी सात वाजता मी घरी आल्याचे बघून आईला आश्चर्य वाटले. आनंदही झाला आणि मोठ्या उत्साहाने तिने आमच्यासाठी गोड शिरा केला. मी खूप दिवसांनी आईजवळ एक आठवडा राहिलो. शाळेतल्या दोस्ताना भेटलो. शेवटच्या दिवशी निघायच्या आधी मी आईला सगळे खरे खरे सांगून टाकले. तिला ते ऐकून काहीच वाटले नाही, म्हणाली माझा तुझ्यावर विश्वास आहे आणि तुला किसन च्या हाती सोपवले, तेंव्हाच माझी काळजी मिटली होती.

ती असे का म्हणाली.

***********

त्यानंतर असा बाका प्रसंग कधी आला नाही. मी संपूर्ण विद्यापीठात पहिला आलो. पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. डॉक्टरेट केली. उच्च गणितातले पुरस्कार मिळाले आणि मी आज एक आंतरराष्ट्रीय ख्यातीचा गणितज्ञ म्हणून ओळखला जातो आणि पुणे विद्यापीठात संशोधन कार्य करतो.

प्रत्येक सणाला मी आवर्जून घरी लोणावळ्याला आईकडे जातो. किसन ला भेटतो. आई आता थकली आहे. पण पुण्याला यायला नाही म्हणते.

*************

घरी पोहोचलो तर आई माझी प्राण कंठाशी आणून वाट पाहत होती. माझा हात हातात घेऊन म्हणाली, मी आता चालले. माझ्या घरी. रडू नकोस. मी खूप समाधानी आहे. तू आलास, मला सगळे मिळाले. माझ्या सगळया इच्छा पूर्ण झाल्या. किसन कपिलेला सांभाळेल. तू किसनला अंतर देऊ नकोस. मी जाते, मला अडवू नकोस.

मग तिने हातात जपमाळ द्यायला सांगितली. पण जप पूर्ण व्हायाच्या आधीच ती निघून गेली. मी पोरका झालो.

आईच्या चेहेऱ्यावर एक असीम शांती विलसत होती आणि ती माझ्या मनापर्यंत पोहोचली. काही वेळ मी तसाच तिच्याजवळ बसून होतो. मनात कोठलेही विचार, भाव, तरंग, खळबळ नव्हती. आनंदमय व शांत. जणू सकाळच्या कोवळया उन्हात पडवीत बसलो आहे, आई समोरच शेण सारवते आहे. दुरातून गावातल्या मंदिरातून काकड आरतीचे आणि भूपाळीचे स्वर ऐकू येत आहेत. आई पण काहीतरी गुणगुणते आहे. परसातल्या कपिलेच्या गळयातली घंटा मध्येच किणकिणते आहे. काळाची गती इतकी धीमी झाली आहे कि त्याचा पावलांचा आवाज अस्पष्ट होत आनंदमय शांततेत विरून जातो आहे.

किती वेळ गेला, आजू बाजूचे, गावातले लोक गोळा झाले. माझा विश्वासच बसत नव्हता, आई गेली त्यावर. मी रडलो नाही. लोकांना वाटले, मी अजून धक्क्यातून सावरलो नाही. पण नाही. आठवण येताच

क्षणात ती समोर येते, कोठल्या न कोठल्या रुपात. किती तरी दिवस हे भास किंवा हा अनुभव येत होते.

आईच्या शेवटच्या क्षणी किसन तिच्या जवळ नव्हता. मला घरापर्यंत सोडून तो कोठे गेला तो आजपर्यंत भेटला नाही, त्याची काही खबर नाही. चिठ्ठी नाही. कोणाला दिसला नाही. त्याची घुंघुर लावलेली काठी घरी कोपऱ्यात उभी आहे. मला त्याची काळजी वाटून राहिली आहे.

***********

काही वर्षे अशीच गेली. माझ्या वैयक्तिक आणि संसारिक जबाबदाऱ्या सांभाळताना माझी खूप ओढाताण झाली. आणि दरवेळेला आईच्या श्राद्धाला मी ठरवत असे कि आता त्याला शोधायचे, पण काही काम निघाले कि राहून जायचे.

पण एका दिवशी दूर दर्शन वर कोण तरी नर्तकाच्या हातात घुंगरे लावलेली काठी बघितली आणि मला किसन ची तीव्र आठवण आली. मी त्याला शोधायचे ठरवले. रजा टाकून किसनला खूप शोधले. वळवण च्या आसपास च्या गावात फिरलो, शेतात, शेतकरी, शेत-मजूर ह्यांच्या कडे चौकशी केली, किसन कधीतरी कोणाला तरी भेटला असेल, दुकानदारांकडे विचारले, वाण समान घेतले असेल, धनगर वस्ती मध्ये गेलो, कोणाची गुरे चरण्यासाठी नेली असतील, पण किसन चा पत्ता लागला नाही. शेवटचा प्रयत्न म्हणून मग पंढरपूरला जाऊन

यावे असे वाटले. तिथे तो लहानाचा मोठा झाला, त्याची बायको तिथे राहते, म्हणजे नक्की सापडेल. म्हणून पंढरपूरला आलो.

सकाळपासून किसनला शोधतो आहे. पंढरपूर मधील प्रत्येक देऊळ बघितले, पुजाऱ्याला, देऊळात येणाऱ्या जाणाऱ्या माणसाना विचारले, असा कोणी अनाथ मुलगा, किसन च्या वयाचा, वर्णनाचा किंवा नावाचा आहे का, होता का, कधी यायचा का, त्याची बायको सुद्धा इथे कोठेतरी राहते, पण कोणाला काही सांगता आले नाही. शेवटी दमून भागून निराश अंतःकरणाने पुन्हा विठ्ठल मंदिरात आलो. खांबाला डोके टेकून डोळे मिटून विचार करत बसलो. किसन आईच्या मृत्यू नंतर जो नाहीसा झाला तो आज पर्यंत भेटला नाही. काय झाले, काय करत असेल, कोठे राहत असेल, कोणाच्या पडवीत कोणी त्याला जागा दिली असेल का, बिचारा सणासुदीला कोणाकडे हक्काने जाईल, पावसाळयात त्याला कोठे आसरा मिळाला असेल का. त्याच्या आठवणीने डोळयात पाण्याची धार लागली. मन विषण्ण, भरून आले.

"परशा, अजून, मला ओळखले नाही." मनात आवाज उमटला.

"अरे, तुझ्या समोर विटेवर उभा आहे तो मीच आहे. प्रत्यक्ष. जिवंत. तुला खांद्यावरून शाळेला घेऊन जाणारा तुझा किसन."

"आईच्या नजरेने पहा, प्रेमाने, पवित्र अंतःकरण आणि श्रद्धा ठेऊन पहा, तुला मीच दिसेन."

"किसन, आरे पण तू कोठे आहेस, समोर ये ना, पुढे ये, किती किती बोलायचे राहून गेले आहे, मला तुझी फार आठवण येत आहे. तुझा परशा मोठा आंतरराष्ट्रीय कीर्तीचा संशोधक झाला आहे, पण त्याचे कौतुक करायला कोणी नाही. आई गेली, तुही गेलास. मी काय करायचे आता."

"आपली आता भेट होणे नाही, जरी तू माझा आहेस. मला प्रिय आहेस. किसनला शोधत तू इथवर आलास, तर किसन ची आठवण घेऊन जा."

खडबडून जागा झालो, पण किसन दिसला नाही कोठे. त्या मंत्रवत आवाजाच्या प्रभावातून मला कोणी तरी बाहेर ओढून आणले, एक मुलगा मला हाक मारत होता, खांद्याला धरून हलवत होता. "दादा, अहो दादा, मी किती वेळ तुम्हाला जागे करतो आहे, गाढ झोप लागली होती वाटते. एका म्हातारे बुवांनी ही वस्तू तुम्हाला द्यायला सांगितली, ही तुमची वस्तू तुम्ही घ्या. मी जातो." त्याने मला एक छोटीसी मूर्ती दिली आणि तो गेला.

मी घड्याळात बघितले, मी तास भर झोपलो असेन. पण त्या विचित्र स्वप्नाचा अर्थ काय.

मूर्ती साधारण १०-१२ इंच उंच होती. ती अर्ध पारदर्शक होती. आखीव रेखीव आणि स्पष्ट होती. मूर्तीला एक निळी किरमिजी रंगाची आभा होती. मी बघण्यासाठी जवळ उचलून घेतली. ती मूर्ती किसन ची

हुबेहूब प्रतिकृती होती. तीच घुंगरू लावलेली काठी, काठीवर हनुवटी ठेवून थोडे पुढे झुकून उभे राहायची पद्धत, पायात कोल्हापुरी पायताणे, डोक्याला तेच मुंडासे, आणि तोच चेहरा. किंचित हसरा, किंचित गंभीर, शांत, आश्वस्थ. किसन उभा होता ती पायाखालची जमीन सुद्धा ओळखीची आमची नेहमीची भेटण्याची जागा होती. इतकेच काय, मूर्ती मधील काठीला लावलेली घुंगरे सुद्धा छान, हलकेच हलत आणि मंजुळ आवाज करीत होती.

मूर्ती च्या तळाशी काही तरी लिहिले, कोरले होते.

"नक्षत्र अरुंधती, चौकोन पहिला, क्षेत्र क्रमांक - २२ / ७ ह्यातील पहिले नऊ नवम पर्यंत, ग्रह अ-ज्ञ ; संमिश्र, क्लिष्ट, स्वज्ञ धातू ; नाव - अभिनित, वजन - १७२९, नील कृष्ण वर्ण, ध्वनी - तार सप्तकात म, उर्जा - स्वाधीन, वर्ग - स्वयंभू."

हे काय होते ?

मोठ्या जड मनाने मी निघालो, किसन ला न भेटता, किसन च्या आठवणी आणि ती त्याची प्रतिकृती घेऊन. आणि त्या तंद्रीत घरी कधी पोहोचलो कळलेच नाही.

घरी पोहोचताच पत्र मिळाले. Royal Society of London, ह्यांनी माझा शोध प्रबंध '१७२९ - आणि तत्सम समीकरणांच्या प्रणाली आणि काही अवकाशस्थ वस्तूंच्या मुलभूत संरचना', परत पाठवला

होता, माझे गणिती निष्कर्ष नाकारले होते. थोडासा उपहासही केला होता. तसाच तडक माझ्या Lab मध्ये गेलो. माझ्या सहायकाला पत्राला उत्तर तयार करायला सांगितले.

जेवताना लक्षात आले, मूर्ती घरी काढून ठेवायची राहून गेली. मूर्तीच्या तळात असलेले वर्णन आठवले. म्हणून मग मूर्ती घेऊन Lab मध्ये गेलो आणि त्यांना मूर्तीचे शास्त्रीय विश्लेषण करायला सांगितले. १० मिनिटात मला तिकडून अतिशय उत्तेजित आवाजात बोलावणे आले, जसे असाल तसे निघून या. "मूर्ती इतकी जड आहे कि त्या वजनानेच table मोडले. चार गड्यांना सुद्धा हलत नाही."

तिथे गेलो, मूर्ती च्या खालचे table मोडले होते. काही काचेच्या उपकरणांचा चुरा झाला होता. एव्हढेच काय, खालची जमीनही वजनाने थोडी खचली होती.

मला आश्चर्य वाटले, मी सरळ जाऊन मूर्ती उचलली आणि बाजूच्या table वर ठेवली. ते पाहून तर सगळे बुचकळ्यात पडले. मी दुसऱ्या काट्यावर वजन केले ते अचूक एक किलो भरले. पण एक गोष्ट माझ्या सराईत अभ्यासू नजरेला खटकली. वजन अचूक एक किलो होते, एक ग्राम अधिक नाही, एक ग्राम कमी नाही. मग वजन शास्त्रीय उपकरणावर ग्राम च्या दहाव्या भागापर्यंत केले. तरी वजन १.००००००००० किलो भरले. आता माझे कुतूहल जागे झाले.

माझा Lab मधल्या सहायकावर विश्वास होता. पण माझे डोळे काही वेगळेच बघत होते. हा एक चमत्कार होता का.

मी त्यांना crane ची व्यवस्था करायला सांगितली, मूर्ती heavy metals च्या संशोधन Lab मध्ये पाठवायचे ठरले. तसेच माझ्या सहायकाला मूर्ती चे वर्णन अवकाश संशोधन शाळेत तपासायला सांगितले. एका आठवड्याने दोनही report आले. आणि माझे आयष्य आमुलाग्र बदलून गेले.

"पृथ्वी वरील कोठल्याही ज्ञात धातुशी ह्या मूर्ती चा धातू मिळत जुळत नाही."

"वर्णनाशी बरोबर जुळणारा ग्रह नोंद झालेला आहे."

"वजन = १७२९.०००००००००० किलो."

"हि मूर्ती एका अज्ञात, स्व-ज्ञ आणि व्यक्ती-विशिष्ट ( Smart & Personalized ) अशा धातूपासून बनलेली आहे, कि ज्याची फक्त शक्यता गणिताने वर्तवली होती ; त्यामुळे हि मूर्ती हे जगातील सर्वात मोठे वैज्ञानिक आश्चर्य आहेच, पण संपूर्ण मानव जातीचा तो एक अनमोल ठेवा आहे."

मी स्वीय सहायकाला Royal Society of London ला पत्राचे उत्तर पाठवायला सांगितले आणि मूर्तीचे photo आणि reports त्या सोबत जोडायला सांगितले. माझे उत्तर फक्त एका ओळीचे होते. "तुम्ही

माझे जे गणिती निष्कर्ष नाकारले आहेत, त्याचे physical proof पाठवत आहे. ते तपासण्यासाठी आपली team कधी येते ते कळवा."

***********

किसन ची आठवण आली. माझ्या समोर एक अनाकलनीय, अद्भुत चमत्कार उलगडत होता. त्या चमत्काराचे जगड्व्याळ स्वरूप मला आता कोठे थोडेसे कळू लागले होते. गहिवरून आले आणि मनात किसन चे शब्द उमटले, "परशा, मी आहे." काय वर्णू माझी स्थिती. आईचा आवडता अभंग आठवला.

*|| सदा माझे डोळा जडो तुझी मूर्ती || रखुमाईच्या पती सोयरिया ||*

*|| गोड तुझे रूप गोड तुझे नाम || देई मज प्रेम सर्वकाळ ||*

*|| विठू माउलिये हाची वर देई || येउनिया राही ह्रीदयी माझ्या ||*

*|| तुका म्हणे काही न मागो आणिक || तुझे पायी सुख सर्व आहे ||*

# चंदेरीचा टेहेळेकरी

*(निष्टावान, नेक माणसाचे कर्तव्य त्याच्या मृत्यूवर मात करते. आणि त्या परीस स्पर्शाने त्याचे जीवनाचे सोने होते.)*

---

यंदाची होळी निमुटपणे घरीच पुरण पोळी खाऊन साजरी केली. धूळवडहि संपली. शुक्रवार आला. पण उत्साह नव्हता. 'saturday night fever' ची शक्यता पूर्ण मावळली होती. साधले, पाछापुरकर, पावशे, थोरात - मनालीला गेले होते. लागोपाठ ३ वर्षे आम्ही दर होळीला राजगडावर जात होतो. बाले किल्ल्यावरून संपूर्ण पंचक्रोशीतली होळी दिसायची. पौर्णिमेच्या चांदण्यात शेकोटी भोवती उरलेली रात्र गप्पा मारत घालवली होती. ही होळी चुकली आणि हा शानिवारही असाच वाया जाणार होता.

कार्यालयात नेहमीप्रमाणे पाट्या टाकत होतो. तेव्हढ्यात चंदू चा फोन आला. जरा आश्चर्य वाटले. चंदू आमच्या trekking group मधला नव्हता. एकच trek लोणावळा - भीमा शंकर आम्ही बरोबर केला होता. म्हणाला भेटू या का मधल्या सुट्टीत. शनिवारचे काही ठरवू. मी जरा विचारात पडलो. आम्ही दोघेच काय आणि कोठे जाणार होतो. त्याच त्या treks चा कंटाळा आला होता. पण तो चंदेरीची माहिती

घेऊन आला. पुणे - मुंबई मधूनच नव्हे तर, चंदेरीला जाणारा हा पहिलाच reki trek असणार होता. ठरले. शनिवारी दुपारी १ वाजता शिवाजीनगर ST depot, पुणे कर्जत गाडी वर भेटायचे.

कोणी आणखी नाही आले तरी आपण दोघे जायचे.

तसा मी बहुतेक सगळ्या किल्ल्यावर जाऊन आलो आहे, तीन तीन, चार चार वेळा. अनोळखी, अनवट, आडमार्गा वरचे किल्ले आणि डोंगर बघितले. अलंग, कुलंग, रतन, मदन, कळसुबाई, हरिश्चंद्र असे नशिक मधले, महीपत, रसाळ, सुमार, असे महाबळेश्वर जवळचे, मच्छिंद्र, गोरक्षा, ढाकचा बहिरी, नागफणी, कोकणकडा - माकडवाटेने, बाण, नाणेघाट, लिंगाणा, लोणावळा कुणे mission ते लोणावळा भजी point via काळ नदी - किती किती trek केले. चंदेरी बद्दल फारसे काही ऐकले नव्हते. deccan queen मधून जाता येता दिसायचा. पण कधी गेलो नव्हतो. चन्देरी बोलावतो आहे, खुणावतो आहे, असे सारखे वाटे. थोडी हुरहूर वाटे, एव्हढा जवळचा, कधी भेटेल, जायला, पाहायला मिळेल.

आज अचानक असा योग जुळून आला होता.

एकची ST दीडला सुटली. आम्ही वांगणीला चार वाजता पोहोचलो. railway track वरून चालत गेल्यावर १५ मिनिटांनी डावीकडे वाडीवर जायची पाय वाट लागली. ५ वाजे पर्यंत वाडी वर पोहोचलो. पाणी प्यायलो, पाणी भरून घेतले. चंदेरीची / वरची वाट

विचारून नक्की करून घेतली. लगेचच वरची वाट धरली. haversacks तशा हलक्याच होत्या. अंथरूण, पांघरूण, आणि पाणी. चंदूने दोन बिस्किटाचे पुडे घेतले stand वर. ते होते. ७ वाजे पर्यंत गुहेत पोहोचायचे, सकाळी लवकर उठून टोकावर जायचे, ८ ला खाली उतरायला सुरुवात करायची, १० वाजताची लोकल पकडून कर्जतला, आणि पुण्याला २ वाजे पर्यंत, घरी दुपारच्या जेवणाला हजर. 'alpine style'.

आम्ही आमच्या rhythm ने, पण न थांबता, धबधब्याच्या डाव्या बाजूने वर चढू लागलो. वाट उभी होती. वाटेत कोठेही सपाटी नव्हती. पण लाकूडतोडयाच्या आणि जनावरच्या एव्हढ्या वाटा, उभ्या आडव्या छेद देत होत्या कि पक्की रुळलेली अशी वाटच नव्हती. अनुमानाने, दोन डोंगरातील खिंडीच्या, V च्या दिशेने जात राहिलो. तास झाला तरी वरचे, खिंडीतले मोकळे आकाश दिसेना. झाडी कमी होत नव्हती. करवंदाच्या जाळया संपेत ना. त्या मुळे चालायला गती येत नव्हती, अंधार पडायला लागला. शेवटी चंदूने सांगून टाकले, आपण वाट चुकलो. खिंडी पासून दूर, धबधब्यापासून दूर, चंदेरीच्या मुख्य डोंगरावर भटकत आहोत. साडे सहा वाजून गेले आहेत. आता उलटी वाट पकडून धबधबा गाठणे आणि वरची वाट शोधणे शक्य नाही. एखादा मोठा दगड / खडक पाहून थांबू या. रात्र अशीच कशी तरी काढू या. सकाळी बघू काय करायचे ते.

विरळ आणि खुरट्या झुडुपांमध्ये वर, उंच आलेला तो खडक फार मोठा नव्हता. पाठ टेकून बसता येईल दोघांना, थोडे पाय पसरता येतील, जेमतेम एव्हढाच. बसून रात्र काढावी लागणार, ह्याची थोडी काळजी वाटली. वेळ जाणार कसा.

आम्ही डोंगरात उंचावर होतो. समोर खाली railway track वरून जाणाऱ्या येणाऱ्या लोकल गाड्या दिसत होत्या. मधूनच एखादी through train मोठा लांबलचक आवाज करत जायची. खाली अंधारात कंदिलाची एखादी प्रकाश रेषा दिसली तर त्यावरून वस्तीचा अंदाज यायचा. पुन्हा काळा कुट्ट अंधार. त्या अंधारात चंदूची आणि माझी कोणी अदलाबदल केली असती तरी कळले नसते. मिट्ट काळोखात हलणाऱ्या झाडांच्या आकृत्या आणि बरोबर जंगलातले चित्र विचित्र आवाज. भयाण रात्र क्षणाक्षणाने पुढे सरकत होती.

वर अथांग, निरभ्र आकाश, त्यात नक्षत्रांचा सडा पडलेला. सावली दिसेल एव्हढा लक्ख चंद्र प्रकाश. मग आम्ही ओळखीची नक्षत्रे, ध्रुव तारा शोधू लागलो. उल्का पडताना दिसतात का त्याची वाट पहिली. प्रकाशाचे प्रदूषण बिलकुल नव्हते. आकाश दर्शनासाठी चंदेरी अतिशय उत्तम जागा आहे.

जुन्या ट्रेकच्या गप्पा, group मधील मित्रांच्या गप्पा, पुढील career च्या गप्पा. गप्पांच्या नादात वेळेचे ओझे थोडे कमी झाले. १२ वाजून गेले. जवळचे पाणी संपले. खाणे संपले. stamina हि संपला.

झोप कधी लागली ते कळलेच नाही. भास, आभास, स्वप्न आणि वास्तव ह्यांच्या सीमा रेषेवर भरकटत आहे अशी एक अंधुक जाणीव होती.

कसल्या तरी आवाजाने खडबडून जाग आली. through train pass होत होती. घड्याळात साडे तीन वाजले होते. चंदू अजून जागा झाला नव्हता. चंदू माझ्यापेक्षा ७ - ८ वर्षांनी तरी लहान असावा. त्याचा stamina चांगला होता. trekking चा अनुभव भरपूर होता. trekking ची सुरुवात त्याने खूप लवकर केली. त्याचे सुद्धा बहुतेक सर्व trek झाले होते. फक्त हिमालयाचा अनुभव नव्हता. त्याची माझी wave length छान जुळायची. त्याची एकच सवय मला खटकत असे, अनवाणी trekking करायचा.

साडे चार वाजत आले. चंदूही जागा झाला. बसुन राहायचा अगदी कंटाळा आला. चंद्रप्रकाशात, उठून चालायला लागलो.

सतत उजवी आणि वरची वाट घेत, करवंदाच्या आणि कारवीच्या जाळ्यांमधून कष्टाने वाट काढत, चालत राहिलो. साधारण दीड तासाने डोंगराची धार दिसू लागली. मग थोड्याच वेळेत धडपडत, सावरत खिंडीत मोकळ्यावर पोहोचलो. चंदेरीच्या दोनही बाजूचा डोंगर आणि शेजारचा डोंगर व्यवस्थित दिसू लागला. traverse दिसली. ती घेऊन गुहेत पोहोचलो. जरा बसलो. ६ वाजले होते. शीतल वाऱ्याच्या

झुळुकेने मन कसे प्रसन्न झाले आणि शरीराचा शीण ही गेला. चंदूने माहिती पुरवली, टोकावर पाणी आहे. पाणी पिऊ, तिथेच आराम करू.

उत्साहानें आणि उल्हसित मनाने पुढची traverse पकडली. अतिशय अरुंद आणि हजार - दीड हजार फुट खोल दरीला सरळ काटकोनात छेद देणारी पायवाट होती. डावीकडे वर चंदेरीचा उभा कडा - कातळ आणि उजवीकडे दरी. पक्क्या पावलांचा, हलक्या चालीचा आणि नाजूक तोल सावरणारा trekker मजेत पार करेल, अशी ती traverse संपली. आता वाट, वळून डोंगराच्या धारेवरून तिरकी वर जात होती. पायाखाली आता पक्की, कातळातली वाट नव्हती. scree ची वाट होती. पक्क्या मातीवरून घसरणाऱ्या बारीक वाळूची, रेतीने बनलेली वाट होती. बरोबर rope वगैरे काही climbing gear आणले नव्हते. scree वरून पाय सरकला, घसरला, तोल गेला, तर हजार फुट खाली. अडवायला, पकडायला, थांबायला, मध्ये, काही म्हणजे काही, छोटी छोटी झुडुपे सुद्धा नव्हती. उभा कडा, सरळ रेषेत खाली गेलेला. मी बूट काढून तिथेच ठेवले. आम्ही haversacks पण तिथेच ठेवल्या. scree ची वाट लांब नव्हती. शे - दीड शे पावले असेल. पण चढाची होती. अगदी सावकाश, शांतपणे, शब्दही न बोलता, पण अंतर राखून, एक एक पाउल पुढे जात राहिलो. टोक म्हणजे एक मोठ-मोठ्या दगड आणि खडकांनी बनलेले कडबोळे होते. चढ संपला आणि टोकावरच्या पहिल्या खडकाशी पोहोचलो.

आणि प्रचंड आश्चर्याचा धक्काच बसला.

समोर, एक माणूस निवांत, दरीत पाय सोडून बसला होता.

आमची चाहूल लागताच पाठमोरा होता तो चपळाईने आम्हाला सामोरा झाला.

अविश्वासाने आम्ही एकमेकांकडे नुसते बघतच राहिलो. बोलायचे सुद्धा सुचले नाही. त्या प्राथमिक धक्क्यातून बाहेर आलो तेंव्हा म्हणालो,

रामराम, आता, इथे, कुणीकडे. - मी.

रामराम, कोन म्हणायचो हो तुम्ही, इथेसा कसे काय. कुनी पाठीवले.

तो माणूस उंच, मध्यम बांध्याचा, उमदा आणि तडफदार वाटला. तीस पस्तिशीचा असावा. पोशाख हुबेहूब मराठमोळा, जणू मोहित्यांची मंजुळा, किंवा बाल शिवाजी, चित्रपटाच्या सेट वरून तडक इकडेच आला असावा, तसा. डोक्याला ती जुनी तशीच, सैनिकाची दाखवतात तशी, लाल पगडी. पायात चामड्याची करकरणारी, सैनिकाची पायताणे. पांढरा, जरासा मळलेला, बाराबंदी झग्यासारखा लांब कुडता, आणि पांढरी, तंग सैनिकाची तुमान. पण सर्वात लक्ष वेधून घेणारे होते त्याच्या डाव्या हातातले सोन्याचे जाडजूड, रुंद, भरीव कडे. आणि गळ्यातला तांबूस, लखलखीत, त्रिकोणी ताईत. दोनही चीजा जुन्या -

पुराण्या, ऐतिहासिक दिसत होत्या. अस्सल होत्या. त्यांची जडण घडण, त्यावरील नक्षी, अप्रतिम, कोरलेली होती.

आम्ही पुण्याहून आलो. - चंदू.

म्या धोंडू सकपाळ, चंदेरीचा टेहेळेकरी. कोंढाण्याच्या दक्षिण दरवाजाने खालच्या अंगास, तीन कोसावर, केळवडे आहे नव्हे, तिथला. म्या राजाचा टेहेळेकरी.

पण आता इथे कसे काय येणे केले. आणि इथे काय करत आहात. - चंदू.

आवो, म्या टेहेळेकरी नव्ह का. टेहेळणी करतू. आणि इथेच असतू कायमचा. म्या इथून कुठ जाणार. म्या राजाचा विश्वासू टेहेळेकरी, राजा संगत कोंढाण्यावर होतो, पन्हाळ्यावर होतो, रायरेश्वराला होतो, राजमाचीला होतो, रायगडाला होतो. गनिमावर टेहेळणी करून राजाला खबर द्यायची. ह्योच काम, पण लई जोखमीच, लई चिकाटीच काम. आणि बघा, एकांडे काम. डोंगर दरयातून, राना वनातून, काट्याकुट्यातून फिराव, काय काय वक्ताला नुस्त बसून वाट पाह्याची. त्यातून राजा लई वकतशीर, तो सांगेल तवा, तिथ खबर पोहोचलीच पाह्यजे. हरेक मोहिमे आधी राजा समद्या टेहेळेकरीना बोलावून राज्यातली खबर घ्यायचा. मोहिमेची सुरुवात बी आपल्या खबरेने व्हायची. पन्हाळ्याची वेढ्याची पुरती खबर म्या दिली होती. आणिक राजा संगत म्या ईशाळ गडावर गेलतो. रायगडावर मोठा सोहळा झाला

तेंव्हा राजाने ह्ये कडे बक्षीस दिले. मग राजा आजारी झाला, तेंव्हा कुण्या सरदाराने मला चान्देरीवर धाडले.

अचानक तो ओक्साबोक्शी रडायलाच लागला.

राजा गेला. रयतेचा सखा गेला. लाखांचा पोशिंदा गेला. शेवटचे बघण्यासाठी लई तडफड झाली जीवाची. पण इथून हटणार कसा. राजाचा हुकुम. कर्तव्यात कसूर केलेली राजाला आवडली नसती.

म्या तीन दिस इथच अन्न पाण्या विना पडून होतो. जगण्याची आस संपली होती. चवथ्या रात्री एक साधू महाराज आले. दवा पाणी केले. खाऊ पिऊ घातले. लई कौतिक केले.

धोंडीबा, राजाचे इमान राखलेस, राज्याची निष्ठा सांभाळली. हा ताईत घे, कायम तुझ्याजवळ ठेव. तहान, भूक, शरीराच्या आधी - व्याधी सगळयातून मुक्त होशील. चंदेरी सोडू नको. देव तुझे भले करो.

साधू महाराज निघून गेले. म्या टेहेळणीच्या कामात बुडलो. नव्या राजेसाहेबना खबर पाठवू लागलो. पण काही वर्षांनी नवा राजा, नवे सरदार, सेनापती चंदेरीला विसरून गेले. मला विसरले. मी पण आता थकलो. अगदी पार थकलो. एकलेपण लई सोसले. पण चंदेरी सोडेना मला. दुसरा कुनी आल्याबिगर म्या जाणार कसा. आता तुम्ही आलात नव्ह. बरे झाले. एका परीस दोघे आलात. आता चंदेरी तुमच्या हवाली करतो. हा ताईत आणि हे कडे घरला, केळवडयाला पोहोचवा. माझा

आता वक्त झाला. मी येतो. निघालो. शिवबा, राजा, तुला शेवटचा मुजरा.

त्याने कडे व ताईत चंदूच्या हाती दिले.

वाळूचे घड्याळ चालू व्हावे, तसे दुसऱ्याच क्षणी त्याच्या शरीराची माती होऊन खाली पडू लागली. आणि पहिल्या पावसात मातीचा सुगंध दरवळावा तसा वातावरणात तो विरून गेला.

आम्ही घाबरलो. घाम फुटला. सुन्न होऊन किती वेळ नुसते बसून होतो. त्याचा चेहरा, त्याचे शब्द आठवत होतो. त्यांचा अर्थ लावायचा प्रयत्न करत होतो.

तहानेमुळे भानावर आलो. टोकावर एका मोठ्या दगडाखाली नीट बांधलेले छोटेसे आखीव रेखीव दगडी टाके दिसले. पाणी अमृत होते.

एका वेगळ्याच झपाटलेल्या जाणीवेने कधी, कसे खाली उतरलो, track वरून येणाऱ्या जाणाऱ्या लोकलचे भान नसूनही स्टेशनवर सुखरूप कसे पोहोचलो कळले नाही. माणसांच्या गर्दीत आल्यावर त्या घडलेल्या गोष्टींची जाग आली.

दूर चंदेरी दिमाखात उंच उभा होता. अनोळखी. त्याचे जणू विराट, विशाल असे दुसरे जग होते, अव्यक्त. अमूर्त. असंबद्ध - मुक्त. निःशब्द. सगुण निराकार.

केळवडयाला पोहोचलो तेंव्हा संध्याकाळ झाली होती. खूप शोधाशोध केली तेंव्हा सकपाळ घर गावाबाहेर, शिवगंगा नदीच्या काठी सापडले. दोन झोपड्या लागून उभ्या होत्या. बाहेर एक जण लाकडे फोडत होता. त्याला विचारले, सकपाळ कुठे राहतात. त्याने एका झोपडीतल्या म्हातारीकडे बोट दाखवले. आम्ही तीला जे घडले तसे सांगितले. ती आम्हाला झोपडीच्या आतल्या भागात घेऊन गेली. तिथल्या देवघरात तसाच हुबेहूब ताईत होता. मग मात्र आमची खात्री पटली. म्हातारीला भरून आले, डोळे पाणावले, म्हणाली.

तुमी लई भाग्यवान. आमच्या घराण्याचा मुळ पुरुष भेटला तुम्हास्नी. ह्यो ताईत आमच्या घराण्यात पिढ्या न पिढ्या चालत, पुजत आला आहे.

आणि ती आमच्या पाया पडायला लागली. मग मात्र आम्ही आटोपते घेतले. ते कडे आणि तो ताईत तिला दिला. पण तिने ताईत चंदुला परत दिला.

पुण्याला पोहोचे पर्यंत रात्रीचे बारा वाजले. मी दोन दिवसांचा उपाशी होतो. चंदुला म्हटले, चल, आम्लेट पावाची गाडी तरी नक्की मिळेल. पण चंदुला आजीबात भूक नव्हती. मी आश्चर्याने चन्दुकडे बघतच राहिलो आणि चंदू मात्र शिळ घालत, शिळोप्याच्या गप्पा मारत, आरामात चालत होता.

# जोकोतीना

*( ह्या पुण्य भूमीचे स्वातंत्र्य ही मानव जातीच्या नव्या उत्थानाची, विश्वाच्या उत्क्रांतीमधील पुढच्या पायरीची मंगल प्रभात आहे. )*

---

कोणत्याही गोष्टीत असते तसेच एक प्राचीन, महान, विस्तीर्ण राज्य होते. निसर्ग सौंदर्याने नटलेला प्रदेश होता. विपुल नैसर्गिक संपत्तीने समृद्ध होता. इतिहासही अभिमानास्पद होता. दुधा - मधाचा देश असा सर्वत्र नाव लौकिक होता. सर्व जगातून निरनिराळे लोक हा देश बघायला येत. खलाशी, प्रवासी, व्यापारी, राजे – राणी – सरदार – अधिकारी, सैनिक, कलाकार, मांत्रिक – तांत्रिक, यंत्रज्ञ – तंत्रज्ञ, साधू – बैरागी – संन्यासी. आणि आक्रमक. त्यांच्या मत - मतांतरानी आणि वर्णनांमुळे देशाला एक गूढ वलय पाप्त झाले होते.

आता, हेच बघा, एका प्रवासी माणसाने ह्या देशाबद्दल काय लिहून ठेवले आहे ते :

“देशात सोन्याचा धूर निघतो, इतका कि त्या प्रदूषणाने सामान्य माणसाला श्वास घेणे अवघड झाले आहे.”

एक खलाशी हा देश शोधत, सात समुद्र पार करून आला आणि जाताना म्हणाला :

“मूर्खांच्या नंदनवनात रेंगाळणारा आणि दिवा स्वप्नात पेंगुळणारा प्रदेश.”

एका अधिकाऱ्याने खलीत्यातून आपल्या राज्यात कळवले :

“राजा सुस्त, प्रजा त्रस्त, अधिकारी मस्त.”

पण इथल्या साधू – संताना विचारले तर ते म्हणतात :

“ ही आहे पुण्य भूमी, सनातन धर्म भूमी, जगतगुरू !!! "

ह्या राज्याचा राजा होता एक गोरा – गोमटा, खानदानी, बावळट पुरुष. अडाणी राजा, भोळी प्रजा ह्यांचे मिळून ते एक कल्याणकारी राज्य होते. राजाचे गुरु – राजगुरू होते आचार्य विनोद गोंधळेकर. ते एक महान नियोगी आणि निःशक्त पुरुष होते. निष्क्रिय लोकाच्या रक्तविहीन निश्क्रांतीचे ते उद्गाते होते. शिवाय ‘अहिंसा परमो धर्मः’ ह्या वैश्विक गोंधळाचेही ते आद्य प्रणेते होते.

राणी कोण होती, कुठून आली, आधी काय करत होती हे कोणासच माहित नव्हते. पण राज्याचे सर्व अधिकार तिच्या हातात होते, हे सगळ्यांना, अगदी पलीकडच्या राज्यातील पानवाल्याला सुद्धा माहित होते.

सगळे असे अपेक्षेप्रमाणे चालले होते, पण त्या दिवशी गोष्टीने आणि नियतीने एक निराळेच वळण घेतले.

***********

ती एक सामान्य, आळसावलेली, सकाळची वेळ होती. राजा नुकताच दरबारात आला होता आणि त्याने सवयीने हाक मारली.

“कोण आहे रे तिकडे ?”

तिकडून उत्तर आले.

“इकडे कोणी नाही.”

राजा म्हणाला “जो कोण तिकडे नाही, तो तिकडे का नाही ? त्याला शिक्षा करा.”

राणी दरबारात प्रवेश करत म्हणाली.

“त्याला कोणती शिक्षा हवी, कोणती नको, ते विचारा. आणि नको असलेली शिक्षा करा.”

कशाचिही फक्त अंमलबजावणी करण्याचे काम प्रधान् मंत्र्याचे अखत्यारीत असल्याने लगेच त्यांना बोलावणे धाडण्यात आले. प्रधान मंत्र्यांच्या दोन दासी – वेन्धळी आणि गोंधळी - ज्या आचार्यांच्या शिष्या होत्या, पुढच्या आदेशाची वाट पाहत तेथेच थांबल्या.

सध्याच्या प्रधान मंत्र्याचे नाव होते जांबुवंत धोंडोपंत प्रामाणिक.

नावाप्रमाणे प्रधान मंत्री खरोखर प्रामाणिक होते. एकदा त्यांच्या जावयाने त्यांना व्यवसाय – धंद्यानिमित काही रक्कम उसनवार मागितली. तर ते स्पष्ट नाही म्हणाले. आणि वर सांगितले कि मुलाबाळासकट घरी येऊन राहा. पण खजिन्यातून पैसे मिळणार नाहीत. असा गृहस्थ, अतिशय प्रामाणिक.

एकदा खजिनदार एका माणसाला त्यांच्याकडे घेऊन गेला.

“सरकार, हा एक अगदी गरीब चोर आहे, पुण्यनगरीत राहतो, बिचारा उपाशी आहे, पैशाची फार जरुरी आहे.”

लगेच जांबुवंतरावनी सांगून टाकले.

“जे काय करायचे, ते समजून, उमजून करा. जबाबदारी तुमची राहील. पण खजिनदार, अशा कितीशा पैशाची जरुरी आहे त्याला ? ”

चोर म्हणाला,

“फार नाही, खाली ४० खेचरे उभी आहेत, त्यांच्या पाठीवर जेव्हढी वाहता येईल तेव्हढीच संपत्ती नेईन म्हणतो.”

तो चोर त्यांना दुवा देत पैसे घेऊन निघून गेला.

एव्हढेच काय. एकदा प्रत्यक्ष राणीसाहेब जांबुवंतरावना म्हणाल्या.

“माझ्या बहिणीला जरा पैशाची निकड आहे, ती तुम्ही भागवलीत तर बरे होईल.”

प्रधान मंत्र्यांनी निर्भीडपणे सांगितले.

“हा सारा जनतेचा खजिना आहे. जबाबदारी तुमची आणि खजिनदाराची राहील. पण असे कितीसे पैसे पाहिजेत आपल्या बहिणीला ?”

राणीसाहेब म्हणाल्या.

“फार काही नाही. खाली १००० गाढवे उभी आहेत. त्यांच्या पाठीवरुन वाहता येईल तेव्हढाच पैसा ती घेऊन जाईल.”

जांबुवंतरावना शब्द मागे घेता येईना. पैसे दिले त्यांनी. हं ! पण स्वतः कधी एका कपर्दीकेलाही हात लावला नाही. असे श्री. जांबुवंत धोंडोपंत प्रामाणिक, प्रधान मंत्री, अतिशय सचोटीचे, हुशार, निष्ठावान आणि मौनी वक्ते होते.

खेचर वाले आणि गाढव वाले ह्यांचे तर ते देव होते.

पण सामान्य माणसांनी मात्र राज्याच्या शब्द कोशात एका नवीन शिवीची भर टाकली – ‘प्रामाणिक’. अतीव उपहास, तिरस्कार आणि हेटाळणी साठी सामान्य लोक ह्या शिवीचा उपयोग करु लागले.

राणीचा हुकुम मिळताच जांबुवंतराव शक्य तेव्हढी लगबग करीत हजर झाले आणि म्हणाले. “कोणती शिक्षा देऊ राणी सरकार ?

स्मशानातल्या रखवालदाराची ? की राज्याचा पाहुणचार घेणाऱ्या पाहुणा कसायाची ?"

ते ऐकून सगळयांच्या अंगावर भीतीने काटा आला. मागे काही वर्षांपूर्वी त्या कसायाने राज्याच्या कोंडवाडयातील जनावरांची अंदाधुंद कत्तल केली, तेंव्हा राणीने त्याला पाहुणचाराची शिक्षा केली होती. कित्येक वर्षे तो खाऊन पिऊन स्वस्थ होता आणि आता वजन वाढल्याने अस्वस्थ होता.

राणीला दया आली आणि म्हणाली.

"प्रधान मंत्री, ह्याचा गुन्हा एव्हढा मोठा नाही. तेंव्हा आमच्या बुद्धिबळात ह्याला प्यादे म्हणून उभे करा. आणि तोपर्यंत तुरुंगात भरती करून ठेवा."

बुद्धिबळाच्या डावात प्यादी प्रथम मारली जातात आणि म्हणून राणीला प्याद्यांची नेहमीच कमतरता भासत असे.

प्रधान मंत्र्यांनी भराभर आज्ञा दिल्या, हुकुम सुटले, सूचना पुढे सरकल्या.

शिक्षा आधीच ठरली होती, गुन्हा हे निमित्त होते,

आता आरोपी सापडला कि झाले.

तेंव्हा मोठ्या धूम धडाक्यात आरोपीचा शोध सुरु झाला.

रस्त्यावरून एक पोरगेलासा तरुण पाणी पिण्यासाठी नदीच्या दिशेने जात होता. त्याच्या बरोबर कोणी दिसत नव्हते. एकटाच असावा. सैनिकांनी त्याला घेरले, दंडुक्याने आणि लाथा – बुक्क्याने भरपूर मारले ; त्यात तो अर्धा मेला झाला, तेंव्हा शेवटी विचारले.

“तू राजवाड्यात, दरबाराच्या बाजूला असलेल्या, महाराजांच्या अभ्यासिकेच्या बाहेर होतास का ? खरे बोल. खोटे बोललास तर चामडी सोलून काढेन.”

तो पोरगेलासा तरुण उत्तरला.

“नाही हो. मी नव्हतो तिथे.”

सैनिक त्याला सरदाराकडे घेऊन गेले. सरदाराने परत दरडावून विचारले.

“तू तिथे होतास ?”

“नाही हो. मी नव्हतो तिथे.” तो तरुण परत उत्तरला.

‘जो तिकडे नव्हता, त्याला शिक्षा करा’ अशी राजेसाहेबांची आज्ञा होती. त्या तरुणाने कबुल केले होते कि तो तिथे नव्हता, म्हणजे त्याला आरोप मान्य होता.

आरोपी सापडला.

आता शिक्षेची अंमलबजावणी पूर्ण होणार होती. राजेसाहेबना तसे कळवण्यात आले.

प्रधान मंत्र्यांची कार्यकुशलता, अधिकाऱ्यांची कार्यतत्परता आणि सैनिकांची कार्यवाही बघून महाराज खुश झाले. राणीला मोत्यांचा हार, प्रधान मंत्र्यांना श्री फळ आणि बाकीच्यांना प्रशस्ती पत्र देण्यात आले आणि दरबाराचे कामकाज संपले.

मग महाराजांना खूपच कंटाळा आला आणि ते सयामी मांजराच्या खोलीत काही विरंगुळा सापडतो का ते बघण्यासाठी तिकडे गेले. राणीला आठवले, बरेच दिवसात ती राजवाड्याच्या गच्चीवर गेली नव्हती म्हणून ती तिकडे जायला निघाली.

**********

गच्चीवर जायला राणीला फार आवडत असे. संपूर्ण राज्यात सर्वात उंच होती राजवाड्याची गच्ची. तिथून खाली खुज्या इमारतींकडे बघताना राणीला खूप अभिमान वाटत असे. राजवाड्याशी स्पर्धा करणाऱ्या इमारती तिला अजिबात आवडत नसत. अशा इमारतींची डोकी छाटण्याची व्यवस्था प्रधान मंत्री करत असत. शेवटी लोकांनी उंच इमारती बांधणे सोडूनच दिले.

गच्चीवर संगीत जलसा रंगात आला होता. तरल सुरांवर मन तरंगत होते. राणीने पाय ठेवला आणि जलसा खाडकन थांबला. राणी

स्थानापन्न झाली, म्हणाली, चालू करा. मग गायक, वादक, आणि श्रोते इतस्ततः सांडलेले सूर परत गोळा करू लागले.

**********

'जो कोणी तिकडे नाही' – जोकोतीनाला, त्या पोरगेलाशा तरुणाला, सैनिकांनी अटक केली आणि ते त्याला शिक्षेसाठी तुरुंगाकडे घेऊन निघाले. राजवाड्याच्या परिसरात दुसऱ्या टोकाला जंगलापर्यंत अनेक तुरुंग होते – सामान्य कैद्यांसाठी, राजबंद्यासाठी, गुन्हेगारांसाठी, बंडखोर कैद्यांसाठी आणि परकीय नागरिकांसाठी. तिथे त्याला त्याच्या शिक्षेची वाट पहायची होती.

ते जसे दरबारातून बाहेर पडले तसे लगेचच जोकोतीनाला कोणीतरी बोलावते आहे, हाक मारते आहे असा भास झाला. दोन – तीनदा असे झाल्यावर त्याने मागे वळून बघितले तर त्याला दिसली एक सुंदर परी, साधारण त्याच्याच वयाची मुलगी. मोठे, काळे भोर डोळे, अपरे नाक, लोभस निरागस हसू, पहाटेच्या पारीजातकासारखे.

सैनिकांनी लगेच सलाम केला तिला.

"छोट्या राणीसरकार, आपण असे इकडे – तिकडे उगाच हिंडू नये. राजेसाहेब, काळजी करतात."

"ह्याला तुम्ही कोठे घेऊन निघालात."

"तुरुंगात."

“हा तरुण, कोठे सापडला ? काय करत होता ? मला सांगा. मी येते तुमच्याबरोबर, वाटेत तुमच्याशी आणि ह्याच्याशी गप्पा मारता येतील. … नाव काय तुझे ?”

“माझे बाबा मला ‘मोठ्या भाग्याचा जो’ असे म्हणतात. तुझे नाव काय ?”

“मला राणीसरकार “देवांची लाडकी स्वेतलाना” असे म्हणतात ; राजेसाहेब “छोटी परी श्वेता” असे म्हणतात. आणि बाकी सगळे ‘छोट्या राणीसरकार’ असे म्हणतात. तू मला श्वेता म्हण आणि मी तुला जो म्हणेन.”

“श्वेता, तू राजकन्या ना, मग इथेच राजवाड्यात राहत असणार, हे ठीक, पण आता माझ्याशी काय काम ?”

“मला ना, वेळ जात नाही आहे, एव्हढ्या मोठ्या राजवाड्यात आम्ही फक्त तिघेच राहतो, शिक्षा केल्यासारखे. बाकी सगळे नोकर – चाकर, सैनिक, रखवालदार, मंत्री - संत्री, सेनापती, मोठ -मोठे अधिकारी, ह्यांनीच राजवाडा भरून गेला आहे. सारखे इकडे जाऊ नका, तिकडे खेळू नका, इथे सभा, तिथे दरबार, जिकडे – तिकडे लोकच लोक. राजकन्येसाठी राजवाड्यात जागाच नाही. प्रत्येक खेळात मीच जिंकणार, प्रत्येक खेळात तेच तेच खेळाडू, मला ना मित्र – मैत्रिणी, ना नातेवाईक, ना शाळेचे सोबती, मला अगदी कंटाळा आला आहे सर्वांचा. तू माझा मित्र होशील !”

“मी तर आहे कैदी. मला नेऊन टाकतील तुरुंगात. मी कसा काय मित्र होणार तुझा ?”

“बरे. तुरुंगाशी पोहोचे पर्यंत मी तुझ्याबरोबर येते. वाटेत गप्पा करू. मला सांग, तू एरवी काय करतोस ?”

“तसे काही नाही. पण मी खूप लाडका आहे माझ्या आईचा, बहिणीचा, बाबाचा, मित्रांचा. माझ्याशिवाय काही चालत नाही त्यांचे. सरपण आणायला आईला मीच पाहिजे, जांभळ पाडायला बहिणीला मीच पाहिजे, नदीमध्ये पोहायला, शेतात, डोंगरावर फिरायला, तळ्यात मासे पकडायला, वाळूत खेळायला मित्रांना मीच पाहिजे असतो. मध काढायला व आंब्याच्या झाडावर चढायला बाबांना माझी मदत होते. आता त्यांचे कसे होणार ?” जोला त्यांच्या आठवणीने अगदी भरून आले.

श्वेताला हे सगळे नवीन, छान, वेगळेच वाटत होते. हा प्रवास म्हणजे तिच्यासाठी एक छान उनाड भटकंती होती. ती जरा लांबवावी म्हणून तिने सैनिकांना तुरुंगाची लांबची वाट धरायला सांगितली. कठडा नसलेल्या झुलत्या पुलावरून काळ दरी ओलांडायची आणि डोंगराला वळसा घालून जादुई इमारती पाशी जायचे.

ते जेंव्हा झुलत्या पुलापाशी आले तेंव्हा पावसाची एक मोठी सर येऊन गेली होती ; काही विरळ ढग दरीत डोकावून बघत होते. सोनेरी प्रकाशाचा एक झोत खोल, काळ नदीतल्या प्रवाहावर तरंगत होता.

आणि हळू हळू समोर इंद्र वज्र सप्तरंगात आकार घेऊ लागले. ते सप्तरंगी वर्तुळ खाली काळ नदीला टेकले होते आणि वरती ढगांना, आणि डाव्या उजव्या बाजूला दरीच्या उंच कातळाला. श्वेता, जो झुलत्या पुलावर धावत सुटले. पुलाच्या मध्य भागी त्यांना त्यांची सावली इंद्र वज्रात दिसू लागली. ते मनोहारी दृश्य पाहत राहावे, हलूच नये असे वाटत होते. इंद्र वज्रातल्या आपल्या सावलीला बघत पुढे मागे होताना श्वेता नकळत पुलाच्या इतक्या कडेला गेली आणि तिचा तोल गेलाच होता, पण जोने चपळाईने तिला सावरण्यासाठी हात दिला. अनर्थ टळला. श्वेता घाबरली, थोडी कावरी बावरी झाली. काही वेळातच निसर्गाचे चित्र पालटू लागले. इंद्र वज्र इंद्र धनुष्य झाले आणि हळू हळू रंग हि फिके झाले. विरू लागले, तसे सैनिक जो ला घेऊन पुढे निघाले.

*************

ते असे खूप वेळ चालत राहिले.

शेवटी ते त्या जादुई इमारती पाशी आले.

“जो, ही जागा फार मजेशीर आहे. जपून, सावध. इथे घडणाऱ्या आणि न घडणाऱ्या गोष्टींची अदलाबदल होत असते. माणसांची आणि घटनांची चुकामुक होते. कारण ह्या जागेला स्वतःचे मन आहे आणि ते फार चंचल, खोडकर मुलासारखे आहे.”

तेव्हढ्यात खरेच गडबड झाली, सैनिक घाबरले, कारण जो दिसेनासा झाला होता. सैनिक त्याला शोधू लागले, हाक मारू लागले,

जो त्यांच्या हाकांना उत्तर देत होता. त्याचा आवाज ऐकू येत होता, पण तो मात्र दिसत नव्हता. सगळे चक्रावून गेले.

"श्वेता, हे लोक मला का सारखे हाका मारत आहेत ? मी तर इथेच त्यांच्यासमोर उभा आहे."

"पण तू आम्हाला दिसत नाहीस ना, म्हणून."

"मी दिसत नाही, म्हणजे मी मेलो कि काय ? अचानक असे कसे झाले."

"थांब, मला विचार करू देत, असे का घडले ते." आणि ती विचार करू लागली. थोड्या वेळाने तिचा चेहरा खुलला.

"जो, अरे तुझे नाव 'जो कोणी तिकडे नाही', तुझ्या नावातच तू नाहीस, म्हणून तू दिसत नाहीस, आता तुझे नाव बदल, 'मी जो, जो इकडे आहे', असे म्हणून टाळी वाजवायची, पण एका हाताने. मग तू परत दिसायला लागशील."

जोने तसे केले, आश्चर्य म्हणजे एका हाताने टाळी वाजली, पण घडले काही नाही.

"माझा जरा गोंधळ होतो आहे, ह्या जागेने आपल्याला हे कोडे सोडवायला दिले आहे. टाळयांची संख्या आणि क्रम म्हणजे डावा - उजवा किंवा उजवा - डावा, असे, ह्याचे ते कोडे आहे. चुकत, चुकत

सोडवायचे कोडे आहे हे. संख्या आणि क्रम ह्यांची एकेक जोडी बाद करत पुढे जायचे."

जो टाळ्या वाजवून दमला. घामाघूम झाला. संख्या आणि क्रम आठवून, आठवून थकला. हैराण झाला. विचार करू लागला, पहिल्यापासून, काय राहून गेले. मग एकदम त्याला आठवले, ३ टाळ्या, उजवा - डावा - डावा, अशा क्रमाने वाजवल्या नाहीत. त्याने तसे केले, नवीन नाव घेतले आणि खरेच तो दिसू लागला.

पण हे काय ? त्याचे जुने कपडे जाऊन त्या जागी त्याचेच, येत्या दिवाळीसाठी घेतलेले, नवीन, कपडे आले होते. असे कसे कपडे बदलले ? ते कपडे तर घरी होते.

कोडे सोडवल्याबद्दल जणू त्या जागेने त्याला बक्षीस दिले होते आणि एका हाताने टाळ्या कशा काय वाजत होत्या, हे काय होते ?

श्वेताला फार, फार आनंद झाला.

जो आता नवीन कपड्यात छान दिसत होता.

सैनिकांना कैदी सापडला, बरे वाटले. पण नवीन काही घडायच्या आत बाहेर पडू इथून, म्हणून त्यांनी घाई केली आणि सगळे पुढच्या वाटेला लागले.

**********

ते असे चार दालने सोडून पुढे आले तर त्याना बरीच माणसे बुद्धिबळ खेळताना दिसली. जो तिथे पोहोचला आणि उत्सुकतेने बघत होता. पटावर प्यादी एकमेकांसमोर नुसती उभी. त्यांच्या पाठीमागे घोडे, उंट, हत्ती, प्रधान ठराविक चाकोरीत फिरता आहेत. घोडे गोलाकार उडी मारून सारखे परत मूळ जागी येत आहेत. उंट तिरके पुढे आणि मागे होत आहेत. हत्ती आणि प्रधान सुद्धा त्याच त्याच घरांमध्ये पुढे – मागे एव्हढीच हालचाल करत होते. जो मग दुसऱ्या खेळाडूकडे गेला. तिथे पण तेच चित्र. सगळया खेळाडूंकडे थोड्या फार फरकाने तेच चित्र. जो गोंधळला. हा काय खेळ आहे, बुचकळयात पडला.

श्वेताने त्याचा गोंधळ दूर केला.

"जो, बुद्धिबळातील हा एक वेगळा प्रकार आहे. ह्या खेळाचा असा नियम आहे कि तुम्हाला फक्त प्रतिस्पर्ध्याची मोहरी हलवता येतात. ज्याची पांढरी मोहोरी असतील, त्याला काळी मोहोरीच हलवता येतात आणि विजय पांढऱ्या मोहोऱ्यांचा करायचा असतो. ज्याची काळी मोहोरी असतील, त्याला पांढरी मोहोरीच हलवता येतात आणि विजय काळया मोहोऱ्यांचा करायचा असतो. प्रतिस्पर्ध्याची मोहोरी हलवून स्वतः डाव जिंकायचा असे हे आव्हान असते."

"फारच अवघड."

"साहजिकच, ह्यात कोणीच दुसऱ्याची मोहोरी हलवून स्वतःची मोहोरी मारत नाही, मग पटावर सगळीकडे मोहोऱ्यांची कोंडी आणि

गर्दी होते. ह्याला 'अहिंसक बुद्धिबळ' असे म्हणतात. राजपत्रित अधिकाऱ्यांचा हा आवडता, अधिकृत खेळ आहे आणि ह्यात सर्वात जास्त वेळ जो खेळेल, तो जिंकतो."

जो बेफिकीर, बेपर्वा मजेत शिळ घालत चालू लागला. तो बुद्धिबळाचा अनवट प्रकार त्याच्या मनातून जात नव्हता. क्षणभर तो शिक्षा, तुरुंग, सैनिक ह्यांना विसरला.

प्रत्येकजण आपापल्या विचारात मग्न होता. चालता चालता बराच वेळ कसा गेला कळले नाही.

सैनिकांनी जोला थांबायला सांगितले, "आमची आता जेवणाची सुट्टी झाली, छोट्या राणीसरकार, आपल्याला राजवाड्यात परत जायला हवे, राजेसाहेब, जेवणासाठी आपली वाट बघतील."

"नाही, मला भूक नाही, मी काही वेळाने परत येईन, असा निरोप द्या."

"जो, तुला भूक लागली नाही ?"

"हो, हो तर, सकाळपासून काही खाल्ले नाही. ह्यांनी पकडले, मार - मारले, कसली भूक, कसली तहान ? जगलो वाचलो तर ठीकच, नाहीतर माझ्या आई – बाबांना निरोप पोहोचवशील, मी त्यांच्यावर खूप, प्रेम करतो."

दोघांच्यातला ताण कमी होण्यासाठी, श्वेता म्हणाली, “दोन दालने पलीकडे जेवणाचे आणि खाऊचे दालन आहे, आपल्याला तिकडे नक्कीच जेवण किंवा काहीतरी खायला मिळेल. चल. जेवताना मला तुझी गोष्ट सांग. ”

जो उत्सुकतेने पुढे निघाला, बरेच दिवसात पोटभर जेवायला मिळाले नव्हते. शिवाय राजवाड्यातले जेवण. त्याची चव, स्वाद आणि लज्जत न्यारी.

***********

त्या दालनात एका लांबचलांब मेजावर कितीतरी प्रकारचे खायचे पदार्थ आकर्षक पद्धतीने सजवून मांडून ठेवले होते. मेजाच्या वरच्या बाजूस भिंतीवर एक पाटी लावली होती.

‘तुम्ही जेव्हढे, जे, जसे खाल, तसे, ते, तेव्हढे व्हाल. निवड तुमची, दोन्ही, पदार्थाची आणि परिणामाची. तुमच्या नवीन भवितव्यासाठी हार्दिक शुभेच्छा.’

ही वेळ विचार करण्याची नव्हती. जोने रिकामी थाळी घेतली. त्यात आवडेल ते पदार्थ वाढून घेतले. खिडकीशेजारील खुर्चीवर जाऊन सुरवातही केली. श्वेताला भूक नव्हती, तिने सरबत घेतले आणि समोरच्या खुर्चीवर बसली.

पण श्वेताच्या सराईत डोळ्यांना कुठेतरी, काहीतरी चुकले, खुपले. कोपऱ्यातल्या आरशात जोचे प्रतिबिंब दिसत होते. आरशातल्या जोमध्ये प्रत्येक घासागणिक बदल होताना दिसत होता.

आरशामध्ये जो कधी लाल, कधी पिवळा, कधी पांढरा, कधी बारका हिरव्या मिरचीसारखा, कधी जाडजूड रताळ्या सारखा, कधी पाण्याच्या प्रवाहसारखा आरपार, तर कधी नेहमीचा हलका गव्हाळी रंगाचा. एखादी रंगीत चित्रफित, जणू. ही त्या जादुई आरशाची आणि भिंतीवरील त्या सूचनेची करामत असावी.

तेव्हढ्यात कुठूनशी खूप माणसे जेवायला आली आणि भराभर पदार्थ वाढून घेऊन निरनिराळ्या जागी बसून जेवू लागली. श्वेता आरशातून त्या सगळ्यांकडे बघत होती. आरशात रंगांचा आणि आकृतींचा उत्सव जणू आकाराला येत होता, उसळत होता.

श्वेताला वाटले, सर्वच मुले लहानपणी कशी साजरी, गोजरी, छान, सुंदर असतात, पण मोठेपणी आपले सगळ्यांचे काय होते असे, का होते असे, कळत नाही.

जो भरपूर, अगदी दोन घास जास्तच, जेवला. तृप्तीचे समाधान त्याच्या डोळ्यात दिसत होते. दोघे बाहेर आले, समोरच्या झाडाच्या सावलीत, बुंध्याला टेकुन गप्पा मारू लागले.

सैनिक काही जेवत होते, काही इतरत्र आडवे होऊन आराम करत होते.

**********

“जो, तुझ्या घरी कोण, कोण आहे. तुझे आई – वडील काय करतात.”

“आम्ही नदीकाठी, मारुतीच्या मंदिराच्या पाठीमागे राहतो. मी, माझे आई – बाबा, दादा – वहिनी, धाकटी बहिण, शाळू – आमची गाय, मोत्या – आमचा कुत्रा. नदीच्या बांधाला लागून आमचे छोटेसे शेत आहे. त्यातून रोजची रोटी भागते. शिवाय आम्ही भाजीपाला पिकवतो. दादा चांगला कारागीर आहे, मूर्ती घडवतो, झोपड्या बांधून देतो. मी झाडावरून मध काढतो. कधी कधी दादा आणि मी गळ लावून मासे पकडतो. जंगलात, डोंगर दऱ्या–खोऱ्यातून मी सरपण गोळा करतो, शाळूला चरायला नेतो, आणतो. वेळ तर पुरत नाही मला.”

श्वेताला आश्चर्य वाटले. वेळ तर सरत नाही तिचा.

घराच्या आठवणीत रंगून, जो पुढे सांगू लागला.

“श्वेता, तुला सांगतो. आई माझी इतकी छान गाते. गाणीही तिला खूप माहिती आहेत, पाठ आहेत. काकड आरतीची, जोत्यावरची, भात कांडतानाची, दिवाळीतली दिव्यांची, संध्याकाळी देवापुढे दिवा लावतानाची गाणी आणि स्तोत्रे. ओसरीवर धाकटीला झोपवतानाची.”

तिला वाटले, किती मंतरलेले दिवस आणि संगीतमय रात्री असतील त्या. जोच्या घराचे आणि घरच्यांचे कल्पनाचित्र काढण्याचा ती प्रयत्न करू लागली. बहुतेक गोष्टी ती प्रथमच ऐकत होती, बघितल्या तर कधीच नव्हत्या. पण त्यांनी तिच्यावर जणू भूल टाकली. ती गप्प, विचारात भरकटत, वाट काढत होती. तासातासाला रखवालदाराची आरोळी आणि राजवाड्यातल्या मोठ्या घड्याळची टिकटिक आणि टोले ह्यात तिचा वेळ गुंतून पडला होता आणि तो गुंता काही सुटत नव्हता.

तेव्हढ्यात सैनिक आले आणि जोला घेऊन तुरुंगाच्या दिशेने चालू लागले.

व्हरांड्याच्या कठड्यावर लांब टोकापर्यंत माकडांची एक टोळी काही बाही खात, उन्हात बसली होती. वाऱ्याच्या शीतल झुळूकेवर मन निवांत झोका घेत होते. जगात अजूनही काही प्रश्न उरले असतील, असे वातावरण नव्हते.

*********

जोची वरात आता व्हरांडे, बागा, पुष्करिणी आणि इमारती ह्यांच्या मधून पुढे चालू लागली. वाटेत एक अति विशाल, उंच, विपुल शाखा विस्तार असेलेला वृक्ष दिसला. जवळ जाताच कळले कि तो आम्रवृक्ष होता. झाड कैऱ्यानी लगडलेले होते. क्षणात जोचा आळस आणि सुस्ती पळाली. ५ – ६ चांगले दगड शोधले, जो कैऱ्या पाडायच्या

उद्योगाला लागला. सैनिकांनी जवळचे दुसरे झाड शोधले, काही सावलीत विसावा घेऊ लागले आणि काही त्याच्याकडे नजर ठेवून होते.

जो तसा नेमबाज, पण आता एकही नेम लागेना. परत ६ – ७ दगड गोळा केले. तो नेम धरून कैरीला दगड मारत होता. पण प्रत्येक वेळी शेवटच्या क्षणी ती फांदी कैरीला पानात ओढून घ्यायची आणि दगड हवेतून खाली पडायचा. झाडाच्या चहु बाजूनी त्याने दगड मारले. दर वेळी झाडाच्या फांद्या कैरींना शेवटच्या क्षणी बाजूला करत, खाली ढकलून देत, वर ओढून घेत, नाहीतर आत पानांच्या दाट गर्दीत लपवून टाकीत. एकही कैरी खाली पडली नाही.

जोला जाणवले, हे काही तरी वेगळेच घडत होते. वारा नव्हता, तरी फांद्या शेवटच्या क्षणी कशा काय हलत होत्या ?

हरलो, दमलो म्हणत, जो श्वेताच्या शेजारी, झाडाकडे बघत खाली बसला. तेव्हढ्यात त्याच्या कानात कोणी तरी बोलले.

“ आमचे स्वातंत्र्य आम्हाला देशील, आमची सुटका करशील ?”

“कोण बोलते आहे ?”

“मी – वारा – पूर्वीचा स्वच्छंद, स्वतंत्र, स्वानंद वारा. पण राजाच्या आज्ञेने आणि प्रधान मंत्र्यांच्या हुकुमाने मला ठीक ठिकाणी कैद केले आहे. दऱ्या खोऱ्यातून, तळ्याकाठी, सरोवरामध्ये, ओसाड

माळरानांवर, नदीकाठी, सर्वत्र निर्वात पोकळीची तटबंदी उभारून, तुरुंग बांधून, आम्हाला त्यात डांबून, जखडून ठेवले आहे. त्यामुळे पाऊस पडत नाही आहे आणि निसर्गचक्र सुद्धा धीमे होत बंद पडेल काय अशी भीती सगळ्यांना वाटत आहे. पशु – पक्षी, वृक्ष – वेली, ह्यांचे भरण – पोषण नीट होत नाही आहे. शेतकरी, सामान्य माणसे, व्यापारी, सर्व प्रजा चिंताक्रांत आहे."

जवळच दुसरे कोणी तरी बोलले.

"कोणाच्या आज्ञा, कोणाचे आज्ञापालन !!!

अनोळखी शासक, अलिखीत हुकुम, अनामिक भय. !!!

आज सावरलो नाही तर विनाशाच्या दुष्टचक्रात सगळेच भरडले जातील.

तुलाच काहीतरी केले पाहिजे."

दूरातल्या समूहगानाचा टिपेचा स्वर लपत नव्हता. समूहगान स्पष्ट ऐकू येत होते.

'आज काही तुफानी घडवू या.

आज काही तुफानी होऊन जाऊ द्या.'

झाडाच्या जवळच्या दोन फांद्या अचानक वाकल्या, त्यांनी त्या दोघांना अलगद उचलले आणि झाडाच्या शेंड्यावर नेऊन बसवले.

जो आणि श्वेता हरखून गेले, चारी दिशांना बघता, बघता.

दूरवर राजवाड्याची गच्ची दिसत होती. रंग – बिरंगी प्रासाद, त्यांचे उंच मनोरे, टेकडीवरचे शिव मंदिर, शहराच्या मध्यभागी वळणे घेत जाणारी नदी, तिच्या पात्रातली बेटे, नदीवरचे पूल, पूर्वेस डोंगराची रांग, निळभोर आकाश, क्षीतिजाच्या वर झगमगणारा सूर्याचा गोळा, पक्षांचे थवे. सगळे कसे आखीव – रेखीव – चित्रवत. त्यातच तेजस्वी उन्हाची उबदार झालर.

श्वेताला भास झाला, दुरातल्या जलशाचे सूर मंदपणे ऐकू येत आहेत.

जोला वाटले, ह्या सुंदर चित्राला कोण्या चेटकिणी ने काळ्या चौकटीत बंदिस्त करून ठेवले आहे.

जेव्हढ्या सहजपणे जमतील तेव्हढ्याच कैऱ्या जोने घेतल्या, सैनिकांना देण्यासाठी.

त्या दोन फांद्यांनी त्यांना शेंड्यावरून अलगद खाली जमिनीवर उतरवले.

आम्रवृक्ष परत निस्तब्ध, निर्विकार, निश्चल झाला, जणू काही घडलेच नव्हते.

परत एकदा काळ पाझरू लागला त्रिमितीतून.

का त्रीमितीला जाग आली काळाच्या चवथ्या मितीमुळे.

आधी काय घडले,

नक्की काय घडले,

खरेच काही घडले होते का. जो ने काही ऐकले होते का.

त्याच्या मनात गोंधळ उडाला होता. विचारांचे काहूर माजले होते, प्रश्नच, प्रश्न. उत्तरे मात्र कोणी देत नव्हते. श्वेताला त्यातले किती आणि काय, काय ऐकू आले होते, कोणास ठाऊक.

***********

राजवाड्याचा परिसर अवाढव्य, अस्ताव्यस्त दूरपर्यंत पसरला होता. त्याला एक पूर्ण फेरी मारण्यासाठी एक दिवस सुद्धा पुरत नसे. राजवाड्याच्या परिसरात अनेक कचेऱ्या, निवास स्थाने, दुकाने, इमारती – नव्या, जुन्या, प्राचीन, मोडकळीस आलेल्या आणि पडक्या, इमारती - आधुनिक आणि अरसिक, खेळाची मैदाने, सुशोभित बागा, वस्तूंची आणि मालाची गोदामे, निरनिराळे बाजार, जनावरांचे कोंडवाडे, कारंजी, पाण्याचे हौद, तलाव, डबकी, झोपड्या, ओसाड जागा आणि अवैध अड्डे सुद्धा होते.

राजेसाहेबांच्या प्रपितामहानी हा राजवाडा बळकावला होता. आता काळाबरोबर पडझडीत त्याचे रूप पालटले, शान गेली, नियंत्रण कमी झाले आणि अवकळा आली.

मातीचे नक्षीदार रांजण आणि फुलदाण्या, असंख्य, बारीक, कोरीव काम केलेले लाकडी दरवाजे, खिडक्या, खांब, मेज आणि खुर्च्या, पलंग, रंगी बेरंगी काचेची तावदाने, वाळयाचे पंखे आणि पडदे, उंच समया, टांगणारी निरांजने, अनेक प्रसंग चित्रित केलेल्या भिंती, गंजलेली शस्त्रे, शिल्पकाम, दगडी एकसंध संगमरवरी पुतळे, ............. आणि जिकडे तिकडे कोळयाची जाळी. गतकाळाच्या वैभवाची आणि नंतरच्या पराभवाची एकदमच आठवण करून देत होते. आताच्या रंजल्या – गांजल्या – त्रासल्या समाजाची, उपेक्षित, अन्याय झेलणाऱ्या माणसांची, ढिल्या – ढाल्या नेतृत्वाची थट्टा करत होते.

प्रत्येक व्हरांड्यातून खाली उतरणाऱ्या पायऱ्या बागेत घेऊन जात आणि बागेतून खाली उतरणाऱ्या पायऱ्या पुष्करिणीशी घेऊन जात. पुष्करिणीतले आणि कारंज्याचे शिल्पकाम, त्यातील पाण्याची व्यवस्था गतकाळातल्या कलेच्या वैभवाची आणि कारागिरीची साक्ष देत होते. सध्या पाण्याचा तुटवडा असल्याने कारंजी बंद होती आणि पुष्करिणी ओस पडल्या होत्या, पाला – पाचोळा आणि चिखलाने भरल्या होत्या.

जिकडे तिकडे दालनांचे, पैसे वाटणाऱ्या कचेऱ्यांमध्ये रुपांतर झाले होते. नृत्य-दालन, शिक्षण-दालन, कला-दालन, संगीत-दालन, शारीरिक कसरतीचे दालन, शेतीचे दालन, सरकारी प्रदर्शने, सरकारी

योजनांची माहिती देणारी ठोकळेबाज दालने ; पण सगळी दालने म्हणजे सरकारी सत्तेचे आखाडे बनले होते. सगळीकडे पैसे मागणारयांच्या रांगा आणि पैसे वाटणाऱ्या अधिकाऱ्यांची बंद दालने.

राजवाड्याच्या मुख्य दरवाजावर आज जरा जास्तच वावर होता. शिसवी जड दरवाजे सारखे कुरकुरत होते. राजेसाहेबांची बहिण आणि राणीसाहेबांची बहिण – दोघी आज राजवाड्यावर येणार होत्या. त्या दोघी नेहमीच एकदम चढाओढीने येत. वावटळ नुसती येत नाही, बरोबर पाला-पाचोळा, कुडा-कचरा, शेण-माती गोळा करत येते. दोघी पूर्ण लवाजम्यासह येणार होत्या. उद्या राजकन्या स्वेतलानाचा सोळावा वाढदिवस होता.

सैनिक आणि पहारेकरी ह्यांच्या तंग तुमान आणि बंडीबरोबर आज शेला पागोटे, फेटा फडका, धोतर कुडता, इतर रंगीत झुळझुळीत वस्त्र-प्रावरणे सुद्धा इकडून तिकडून मिरवताना दिसू लागली.

राजेसाहेबांची बहिण एक हास्य वैद्य होती. प्रत्येक दुखण्या-खुपण्यावर तिने एक विशिष्ट हास्य औषध प्रणाली तयार केली होती. कोणत्या पट्टीत, किती वेळ, कसे हसले म्हणजे कोणता रोग बरा होता ह्याचे शास्त्र-शुद्ध शिक्षण ती देत असे. रोज पहाटे एक तासभर ती सर्वांकडून हास्य सराव करून घेत असे.

राणी सरकारांची बहिण एक गायक, वादक होती. गायनात तिची खर्ज गायकी होती आणि वादनात तिची संकरीत शैली होती. तीही रोज पहाटे एक तासभर सर्वांकडून समूह गायनाचा सराव करून घेत असे.

दोघांच्या सम्मिलित प्रयोगांमधून वरचेवर घर्षण होऊन ठिणग्या पडत आणि त्याची धग राजा आणि राणी पर्यंत पोहोचत असे. उद्या होणाऱ्या राजकन्येचा वाढ दिवस समारोहात त्या आपापल्या कलेची प्रात्यक्षिक सादर करणार होत्या.

***********

सैनिक, जो आणि श्वेता अशी मिरवणूक तुरुंगाच्या दिशेने चालत होती.

दाट झाडीचा आणि चढाचा थोडा भाग पार करून ते वर आले तर रस्त्याच्या बाजूला एक अति विशाल माळरान लागले. माळरानात रस्त्याच्या जवळ रंगी बेरंगी तंबू पडलेले दिसत होते. कुत्री पुढे येऊन भुंकायला लागली. घोडागाडीचे घोडे चरताना दिसत होते. गायी बैल, शेळ्या मेंढरे, बकऱ्या कोंबड्या – पुरा बारदाना सुखात संचार, विहार करताना दिसत होता. इतःस्ततः उघडी – नागडी पोरे खेळत, बागडत होती. चुली लावल्या होत्या. चुलींवर शिजवण रटरट करत होते. काही बायका वाटण – घाटण करत होत्या. पुरुष माणसे आंघोळी करत होती. काहीजण बकर-कोंबड कापीत होते. काहीजण बैलगाडी – घोडागाडी दुरुस्त करत होते.

सैनिकांच्या सरदाराने दंडुका आपटून चढ्या सुरात विचारले, “इथे काय करता आहात ?”

त्या आवाजासरशी एक प्रौढ, भारदस्त आणि आकर्षक स्त्री हसत, हसत तंबूबाहेर येत म्हणाली.

“काय पाहुणे, विसरलात ? आम्ही मागच्या जत्रेला आलो नव्हतो का. दरबारात, राजवाड्यात नाच - गाणी – कसरती – जादूचे प्रयोग केले होते. विसरलात सारे ? तुमच्या राणी सरकारांचा कुत्रा हरवला होता. मीच तर तो तुम्हाला सापडवून दिला होता.

आम्ही जिप्सी, परत यावसे वाटले म्हणून आलो. आपली ही स्वेतलाना, राजकन्या, हिचा वाढदिवस आहे उद्या, बरोबर ? त्यासाठीचे म्हणून आमंत्रण आहे आम्हाला. आणि हा, जो, मोठा भाग्याचा हो. नदीकाठी मारुती मंदिराच्या पाठीमागे राहतोस ना.”

जोला आश्चर्याचा धक्काच बसत होता.

“जो, तुझ्या बा कडून मी देवीची मूर्ती करवून घेतली होती फार पूर्वी. आणि धाकटी कशी आहे ? तिला काळा आजार झाला होता, तो मीच तर बरा केला होता, विचार तुझ्या बा ला.”

एव्हढ्यात काही सैनिक तिला बघून पुढे झाले आणि तिला म्हणाले, “कशा आहात ताई, आपण. आपले उपकार कधी विसरणार नाही आम्ही.”

तीही त्यांच्याशी अगदी जुनी ओळख असल्याप्रमाणे बोलत होती, तिला त्यांची, त्यांच्या घरातील माणसांची माहिती होती, तिने त्यांना वेळोवेळी मदत केली होती.

आता श्वेतालाही आश्चर्य वाटत होते. ही गूढ स्त्री कोण होती ?

त्या स्त्रीने त्या दोघांना तंबूत बोलावले. तिथे असलेल्या रमलामध्ये बघायला सांगितले. ती रमलात बघता बघता भान हरपली. काही अदृष्ट, असंबद्ध सांगू लागली.

"खोल समुद्रात आध्यात्मिकतेची एक प्रचंड लाट शंभर वर्षापूर्वी उसळली होती, ती आज आता किनाऱ्यावर येऊन आदळणार आहे. ........... अटक होणार नाही, ........... निर्दोष मुक्तता होईल, .......... म्हातारीला तिचा मुलगा भेटेल, .............. सूर्योदयापर्यंत सांभाळ, ............... उद्या मध्यान्ही बोलावणे येईल, ................... उद्याच्या समारोहात निवृत्तीची आणि राज्याभिषेकाची घोषणा होईल. अग्नीफुल ... अग्नीफुल कोठे आहे..... अग्निफुलाला सांभाळ."

ती जागी झाली. पटकन बाहेर जाऊन तिने चुलीतून विस्तव आणला. बघता बघता तिने त्या विस्तवाचे - अग्निशिखेचे एक अग्नीफुल बनवले. ते फार तेजस्वी रंगांचे, शंभर पाकळ्यांचे, कमळ होते, त्याला अग्नीसारखे ज्वलंत देठ होते. त्याचे केसर म्हणजे जिवंत प्रकाश रेघा होत्या. कमळाभोवती मधुर, संजीवक सुगंध दरवळत होता. त्या दोघांना ते अग्नीफुल देत म्हणाली.

"जोपर्यंत तुमचे एकमेकांवर प्रेम आहे तोपर्यंत हे कमळ कोमेजणार नाही आणि जोपर्यंत ते असेच ताजे टवटवीत राहील तोपर्यंत, जो तू राज्य करशील. श्वेता तुझ्या मृत्युसमयी ते माझ्याकडे परत येईल आणि अग्नीशी एकरूप होईल."

परत ती बाहेर गेली आणि त्यांच्यासाठी काही पेय घेऊन आली. तिने रमल बाजूला ठेवला तसे जोने त्या स्त्रीस विचारले, "तुम्ही खरेच कोण आहात ? तुम्ही काय काम करता ?"

श्वेताला आठवले कि गेल्या वर्षी जादूचे प्रयोग केले ती हीच स्त्री.

आता ती थोड्या स्वस्थतेने बोलू लागली.

"नाव नाही. गाव नाही. आम्ही जिप्सी, भटके, वाऱ्याच्या झोतात पिसासारखे आणि काळाच्या ओघात क्षणासारखे मिसळून जाणारे. स्वातंत्र्य हेच आमचे जीवन मूल्य. मनस्वीपणा हा स्वभाव. ह्या माळराना सारखे आमचे आयुष्य. ओसाड, निरुद्देश तरी जीवनावर प्रेम करणारे, निसर्गाशी जवळीक साधणारे, आमच्या कुटुंब कबिल्याशी निष्ठा ठेवणारे."

तेव्हा श्वेता म्हणाली. "पण तुम्ही तर किती ज्ञानी, संगीत, नृत्यं आणि कला, ह्याचे जाणकार, उत्तम वैद्य आणि भविष्यवेत्ते, आणि किती मदत करत आहात सर्वांना, गेली पन्नास साठ वर्षा पासून. पण

तुमचे वय तेव्हढे वाटत नाही. तुमचे मूळ गाव कोणते, कोठून आलात, तुमचे आई वडील काय करत होते. तुमचा व्यवसाय काय ?”

“मी ह्या जिप्सी कुटुंबातील ‘देवीला वाहिलेली व्यक्ती’ आहे. आदिमायेचे लेकरू, तिचे बोट धरून ती जिकडे नेईल तिकडे जाणार. मला भूतकाळ वर्ज्य आहे. माझ्या भविष्याची काळजी तिच्यावर सोडली आहे. मला फक्त वर्तमान आहे, आदिमायेने नेमून दिलेले काम करणे आणि नेमून दिलेले काम झाल्यावर तिच्या कुशीत शिरून मांडीवर डोके टेकून स्वस्थ झोपी जाणे. हाच जीवितहेतू, हाच आनंद, ह्यापेक्षा परके ते मरण.”

जो म्हणाला. “कोणी तरी तुमच्यावर कोणते काम सोपवले आहे, हे इतके गूढ आहे का. तुम्हाला योग्य वाटले तर सांगा.”

“जगन्नाथाचा रथ अनादी काळापासून चालत आला आहे. जगन्नाथाच्या रथाला असंख्य चाके आणि त्या चाकांना अगणित आरे. रथाच्या चाकात आऱ्याचे जे कार्य तेच अशा ‘देवीला वाहिलेली व्यक्ती’चे जगात कार्य.

सगळ्यांनी मिळून हा जगन्नाथाचा रथ ओढायचा आहे. पण आपण सर्व रथ ओढणारे एकाच दिशेने एकसंधपणे रथ ओढत नसतो. भिन्न शक्ती, वेग वेगळ्या दिशा, उलट सुलट विचार प्रवाह आणि दृष्टी काम करत असतात. त्यामुळे रथाचा हा प्रवास सुद्धा सतत अंतर्विरोध

आणि असमतोल ह्यामुळे अडखळत होतो. तो अखंड, सुरळीत होईल असा प्रयत्न करणे हेच अशा व्यक्तीचे कार्य आहे.

त्यासाठी कधी कधी उत्क्रांतीच्या एखाद्या टप्प्यावर अडकलेल्या जीव जंतू प्राणीमात्रांना सोडवणे, शक्ती देणे, त्यांना वरच्या आरीवर स्थिर करणे, कधी कधी घटनांना कुलूप लावणे, बेभान गतीला आवरणे, अवरोध निर्माण करणे, तर कधी बंद रस्ते खुले करणे, अतिरेक टाळणे, हेच मोठे काम आहे. उत्क्रांतीचा प्रचंड लोंढा, जणू उर्ध्वगामी हिमप्रपातच, अविवेक, अतिरेकाने तो खाली कोसळला तर विनाश आणि अवनती. ते टाळण्यासाठी सतत कार्यरत असावे लागते. समाज मानसाला वळण, दिशा देणे, त्याची जडण घडण, इतिहासाला कलाटणी देणारे योगायोग साधणे व सांधे बदलणे, हे आमचे काम आहे. सामान्यपणे ह्याला नियती असे म्हणतात."

"पण ह्यासाठी लागणारी शक्ती, जगात शक्तीच फक्त कार्य करते, आणि तीच नेहमी कमी पडत असते, नाही ?" श्वेता म्हणाली.

"होय, अगदी बरोबर. अशा व्यक्तीस देवी जरूर त्या सर्व शक्ती त्या त्या वेळी पुरवते. हे काम करत असताना अशा व्यक्तीला उर्जेच्या निरनिराळ्या स्तरावर काम करावे लागते. त्यासाठी तुमच्या जगातील जड मूढ नियम ती ओलांडू शकते. भविष्यात डोकावू शकते, भूतकाळ जाणून घेऊ शकते, वर्तमानाला दुरुस्त करू शकते. चार मिती, उर्जेचे स्तर, त्या स्तरावरील सजीव निर्जीव जग, चित्र विचित्र विश्व, स्थूल

सूक्ष्म, जड – तरल सर्वातून संचार करावा लागतो, सर्वांशी भिडावे लागते, पण ह्यात अशा व्यक्तीचा स्वतःचा काहीच हेतू व स्वार्थ नसल्याने ती व्यक्ती आदिमायाच्या आशीर्वादाने सर्व काही निभावून नेते.

काळाचा ओघ जेंव्हा विरळ होतो किंवा गती धीमी होते तंव्हा, अंतरिक्षातील नवी आव्हाने, पृथ्वीवरील उत्पात, उत्क्रांतीची चाल-ढकल गती ह्यातून विश्वाचा तोल ढळू लागतो तेव्हा, तो सावरण्यासाठी आदिमायेचे यंत्रज्ञ, तंत्रज्ञ, कारागीर म्हणजे अशा दिलेल्या व्यक्ती होत आणि शेवटी हे काळ – काम – वेगाचे तीकाटणे दुरुस्त करावे लागते, स्थळ – काळ – उर्जा ह्याचा त्रिकोण साधून जगन्नाथाचा रथ पुढे न्यायचा असतो.”

“पण तुमच्यावर ह्याची कोणी सक्ती तर केलेली नाही ना ?”

“ह्या शब्दांना काहीच अर्थ नाही, आदिमायेच्या विश्व - मनाशी त्या व्यक्तीचे मन इतके एकजीव असते कि विसंगतीला वावच नाही, त्यामुळे अखंड आनंद आणि उर्जास्वरूप अशी ती व्यक्ती भौतीकाच्या पार असते, कार्य कारण भाव तिथे संपतो, तर्काचा पांगुळ गाडा सोडून द्यावा लागतो, प्रतिभेने भरारी घ्यावी लागते, श्रद्धा आणि प्रेम भाव हाच मार्ग दर्शक असतो. आदिमायेवर सगळा भार टाकून मी आश्वस्थ आहे. तुम्हीही राहा.”

तिने त्या दोघांना प्रेमाने जवळ घेतले, अग्निफुलाला हलकेच स्पर्श केला आणि म्हणाली.

“चला आता घाई करा, एक आजी कधीपासून मुलाच्या वाटेकडे डोळे लावून बसली आहे.”

संध्याछाया दिसू लागल्या. जो सैनिकांच्या स्वाधीन झाला आणि ते तुरुंगाकडे चालू लागले.

**********

कोडे जास्त गुंतागुंतीचे बनत चालले होते. जो ला ते सगळे अशक्य, कल्पनेच्याही पलीकडचे वाटत होते. श्वेताला कुतुहूल वाटत होते, आश्चर्य वाटत होते, राग येत नव्हता, कारण तिला जो आवडला होता, आणि ही एकच गोष्ट सत्य होती.

दोघे निशब्दपणे, एका नव्या नजरेने एकमेकांना बघत होते.

अचानक त्या शांततेला सुंदर, स्वर्गीय सुरांची साथ मिळाली. त्यांचे पाय खिळले जागीच, विचार थांबले, मागे पडले, ते सूर जणू स्वयंप्रकाशी होते. त्या सुरावटी बरोबर रंग – सूर - प्रकाश – आनंद ह्यांचा उत्सव – जल्लोष सुरु झाला मनात. ह्रिदयाला भावणाऱ्या, मनाला उन्मन करणाऱ्या त्या सुरामध्ये इतकी शक्ती होती कि त्यांची उदासीनता, खिन्नता आणि काळजी, मळभ दूर व्हावे तसे एका क्षणात दूर झाली. भान हरपले.

असा किती वेळ गेला कळले नाही. संध्याछाया संधीप्रकाशात मिसळल्या. त्यांच्याभोवती काही धूसर आकृत्या घेर धरून, गर्दी करून असाव्यात असा भास होत होता. मनाला बाह्य ज्ञान अंधुकसे होत होते, सूर कानात रुंजी घालत होते, प्राण त्यात अडकला होता, शरीराला पुढे पाठवले होते. कोणीतरी बोलत होते, विचारत होते.

“”तुम्ही ऐकत होतात, तुम्हाला आमचे संगीत ऐकू येत होते ?

“तर मग तुम्हीच आहात, जे निवडले गेले आहात. मोठा भाग्याचा जो आणि देवांची लाडकी स्वेतलाना. निःसंशय. नियतीच्याच प्रयत्नाने अशा भेटी गाठी होतात आणि पाहिजे तीच माणसे समोर येउन उभी ठाकतात.”

“ह्या स्वर्गीय संगीताचे रचनाकार – संगीतकार कोण आहेत ? असे संगीत मी आजपर्यंत कधीही राजवाड्यावर ऐकले नाही.” श्वेता म्हणाली.

“पण मी ऐकले आहे, एक – दोन वेळा. मला गुरांना घेऊन परत यायला खूप उशीर झाला होता. पौर्णिमेचा चंद्र वरती आला होता. मी आणि माझी गुरे डोंगरावर, रानातच शेकोटी भोवती बसलो होतो, तेंव्हा पहाटेपर्यंत मी ऐकत होतो. ते तुम्हीच होतात का ?” जो म्हणाला.

“होय. ते आम्हीच. आम्ही यक्ष, हे यक्षगान आमचेच. आम्ही संगीतात रममाण होत असतो, संगीत ऐकत – ऐकवीत असतो. जिथे

जिथे दुःख आहे, वेदना आहे, तिथे आम्ही जातो, ते हलके करायचा प्रयत्न करतो, दुःखी, पिडीत, हताश, असहाय, निराश मनाला विरंगुळा देतो. संगीताच्या दैवी स्पर्शाने आशा प्रफुल्लीत करतो. जगण्यासाठी बळ देतो.

संगीताशिवाय आमचे जीवन असह्य आहे, संगीतामुळे ते सुसह्य झाले आहे.''

''पण तुम्ही जर यक्ष आहात तर तुम्हाला दुःख आणि वेदना नसणार, मानवी अपूर्णतेचा तुम्हाला परिचय असायचे कारण नाही.''

''श्वेता, आम्ही यक्ष आहोत खरे, पण शापित यक्ष आहोत, शाप हा आमच्या दुर्दैवाचा भाग होता. आणि उःशाप हे जणू निमित्त करून नियतीने दिलेले वरदान आहे.''

जो म्हणाला, ''तुमचे दुःख हलके होणार असेल तर हे कसे घडले ते सांगा.''

यक्ष सांगू लागला.

''एकदा आत्मा मायेच्या राज्यात फिरायला निघाला होता. तेंव्हा त्यांच्यामध्ये जो संवाद झाला ते झाले संगीत, फिरताना त्यांचा जो पदरव होता त्याचा झाला ताल, त्यांचा जो पदन्यास होता त्याचे झाले नृत्य, त्यांच्यामधील अबोल, गूढ शांततेवर जे तरंग उठले ते झाले साहित्य. त्यांच्या त्या एकांतातील निर्मिती प्रक्रियेचे आम्ही चोरून

साक्षीदार झालो, आम्हाला मोह आवरला नाही, इतका कि आम्ही बेजबाबदारपणे त्या निर्मितीच्या प्रक्रियेची नक्कल करायचा प्रयत्न केला. त्यांना ते समजले तेंव्हा त्यांनी शाप दिला आम्हाला.

'ह्या दिव्य घटनेचे तुम्ही चोरून साक्षीदार झालात आणि त्याची भ्रष्ट नक्कल केलीत, तेंव्हा तुम्ही मानवाच्या चिरंतन, सनातन वेदनेचे, दुःखाचे सुद्धा साक्षीदार व्हाल. तुम्हाला त्याच्या अपूर्णतेची प्रत्यक्ष अनुभूती घ्यावी लागेल, ही भळाळती जखम उरात घेऊन तुम्हाला ह्यापुढे जगावे लागेल.'

तेंव्हा आम्ही खूप प्रार्थना केली, करुणा भाकली, दयेची याचना केली, मग त्यांनी उःशाप दिला संगीताचा. 'तुमच्या वेदनेपासून संगीत तुमची सुटका करू शकेल.' दुःखाला तर खंड नाही, पण त्याचा विसर पाडण्यासाठी संगीताची आराधना करतो आम्ही, संगीताला आळवतो. जसे दुःख आणि वेदना ह्या अनंत आणि नित्य नूतन आहेत, तसेच संगीतही अनंत, चिरतरुण, नव नव उन्मेशशाली आहे. म्हणून तर संगीताच्या तालावर थिरकणारी पावले अजून तोल सावरून आहेत, स्वतःचा आणि जगाचा."

एका पुर्णांकाचा एक शून्य विराम झालेला बघणे ही दुःखदायक गोष्ट होती. पण त्यांनीच पृथ्वीवर संगीत आणले, ही आनंदाची गोष्ट नव्हती का. श्वेताने नकळत अश्रू पुसले, जोचा हात घट्ट धरला आधारासाठी, असे ते आणि यक्ष किती वेळ बोलत राहिले. शेवटी

निघताना यक्षाने गहिवरून जोचा आणि श्वेताचा हात हातात घेतला, त्याला एक ताईत भेट देत सांगितले. “हा ताईत हातात घेऊन तू ज्याच्याकडे बघशील, त्याच्या मनातील तुझ्याविषयीची शत्रू भावना नष्ट होईल, ह्याला जप, ह्याचा उपयोग कर आणि अजातशत्रू हो.”

यक्ष निघून गेले, सैनिक अवाक होऊन बघत राहिले.

श्वेता विचार करत होती, यक्षाच्या बोलण्यावर.

ही मानवी वेदना म्हणजे पुष्करिणीतील कमळाची वेदना असेल का. कमळाला पुष्करिणी बाहेर जग नाही, चिखलापासून सुटका नाही, चिखलाच्या मदतीनेच चिखलातून वर उठायचे, सूर्य प्रकाशाला भेटायचे, भ्रमराशी गुज–गोष्टी करायच्या, कोमल रंग आणि सुगंधाच्या मस्तीत राहायचे, आणि चिखलातच परत मिसळून जायचे. दुःख खरे कि आनंद खरा कि अस्तित्वाची धडपड खरी कि सगळेच खोटे. तिचे जीवन त्या कमळासारखे होते का, कुणास ठाऊक.

धडधडत्या मनाने तिने अग्निफुलाकडे बघितले, ते जणू नुकतेच फुललेले, ताजे, टवटवीत दिसत होते. तिला खुणगाठ पटली, विश्वासाची, प्रेमाची, मैत्रीची.

ढगातून चंद्र बाहेर आला होता, चांदण्याने आसमंत उजळला होता.

*********

तुरुंगाची भिंत दिसायला लागली. खूप खूप उशीर झाला होता. सैनिकांना असे झाले होते कधी एकदा जोला तुरुंग अधिकाऱ्याच्या ताब्यात देतो आणि सुटतो. जोच्या मनात भीती दाटून येत होती. श्वेता विचार करत होती, दिवसातील अनेकोविध घटनांचा, माणसांचा, त्यांच्या बोलण्याचा. मनात कल्लोळ उठला होता विचारांचा आणि भावनांचा.

तुरुंगाची उंच तटबंदी जवळ आली, भक्कम दरवाजा दिसायला लागला.

तेव्हढ्यात कुठूनसा रडण्या कण्हण्याचा आवाज आला. बाजूला जवळ एक झोपडी दिसत होती. मिणमिणता दिवा तेवताना दिसत होता. आवाज तिथूनच येत होता. श्वेता तिकडे धावली. झोपडीच्या दारात एक म्हातारी रडत, विव्हळत, शोक करत होती. दुःखाने अनावर होऊन ती थरथर कापत होती. कपाळ दरवाजावर आपटून घेत होती. कधी अंग धाडकन जमिनीवर टाकून देत होती. निपचित पडून हुंदके देत होती. परत दुःखाच्या आवेगाने हात आपटत होती. तिला बिलकुल भान नव्हते.

अचानक सैनिकांपैकी एक पुढे आला आणि तिच्यावर खेकसला, गप्प बस म्हातारे, पण तिच्या रडण्याला आणि टाहो फोडण्यला अंत नव्हता. तसे त्या सैनिकाने तिला फाडकन एक मुस्कटात मारली. त्याने ती हेल्पाडली आणि खाली कोसळली. बेशुद्ध झाली.

ते बघून संतापलेल्या जोने शेजारच्या सैनिकाची तलवार खेचली, आणि तलवारीच्या एका घावात त्याचा हात खांद्यापासून धडा वेगळा केला.

क्षणभर कोणाला काय घडते आहे ते समजले नाही. पण ते उमजताच ते सैनिक जोवर हल्ला करणारच होते, पण श्वेता त्या धक्क्यातून प्रथम सावरली आणि ओरडली, “थांबा, एक पाउल पुढे टाकू नका.” जोला शांत केले, काही सैनिकांना तुरुंगातील वैद्याकडे पाठवले, काहीना प्रथमोपचार करण्यास सांगितले. मोठा कोलाहल माजला, पण दंगा होता होता राहिला. श्वेता परत त्या म्हातारीकडे गेली. तिने तिला जोच्या मदतीने उठवले, झोपडीच्या भिंतीला टेकून बसवले, पाणी पाजले, तसे म्हातारीला शुद्ध आली, हुशारी आली आणि ती बोलण्याच्या मनःस्थितीत आली.

थोडा वेळ कोणीच बोलले नाही. मग श्वेताने हळू हळू बोलायला सुरवात केली.

“आजीबाई, तुम्ही आता कशा आहात ? काय झाले. त्या सैनिकाच्या दुष्कृत्य बद्दल मी तुमची माफी मागते. तुम्हाला एव्हढे कोणते दुःख आहे मला कळेल का.”

“माझ्या नातवाला पकडून नेले हो त्यांनी. अजून मिसरूड ही फुटली नव्हती, तर सैन्यात भरती करण्यासाठी पकडून नेले. माझा एकुलता एक आधार गेला हो. आता मी कसे जगू. कोणाकडे पाहून

जगू. आता तो मला कधीही दिसणार नाही. देवा, मी काय करू. माझ्याच नशिबी हे असे का. मुलगा हौसेने सैन्यात गेला, तो परतलाच नाही. नुसते कळवले शत्रूशी लढताना मेला. त्या धक्क्याने सुनेने जीव दिला, माझ्या पदरात नातवाला ठेवले आणि निघून गेली कायमची. मोठ्या कष्टाने वाढवला होता मी त्याला. ह्या वयात काबाड कष्ट करून मोल मजुरी करून पोट भरत होतो आम्ही. पण बघवले नाही. प्रधान मंत्र्यांचा हुकुम होता सैन्य भरतीचा. आम्हाला कोणी विचारले सुद्धा नाही. गेले पाच वर्षे असेच चालू आहे, सर्व राज्यातून पकडून घेऊन जातात तरुणांना आणि ही मुले गेली कि दिसतच नाहीत परत."

जोला आठवले, वाऱ्याचे ते वाक्य, 'अनोळखी शासक, अलिखित हुकुम, अनामिक भय.' प्रधान मंत्री तर कोणताच हुकुम काढत नाहीत, कि कोणता हुकुम का काढला नाही म्हणून विचारत नाहीत. प्रधान मंत्री एक जिवंत मढेच आहे. मग हे सगळे कोण घडवते आहे ?

त्याचा सुद्धा हाच अनुभव होता. रस्त्यावरच्या कुत्रांना पकडून नेतात, तसे नेतात पकडून मुला मुलीना. ते येणार त्याची आगाऊ कल्पना मिळावी म्हणून बाबा सरदाराला एक पोते तांदूळ पोहोचवतात दर वर्षी. ते येणार असले कि जोला दिवसभर रांजणात लपवून ठेवायचे बाबा. दर वर्षी येणारा तो काळा दिवस तो कसा विसरेल.

म्हातारी मनाशी काही ठरवून जोला म्हणाली.

"मुला, ती तलवार दे, आज देवाची परीक्षा घेऊ देत मला. जर मी माझ्या आयुष्यात कधीही कोणाचेही वाईट चिंतले नसेल, प्रामाणिकपणे, कष्टाने मिळालेल्या भाकर तुकड्यावर आजपर्यंत जगले असेन, आणि माझ्या हातून कधीही कोणतेही पाप घडले नसेल तर ह्या आटलेल्या डोळयातल्या अश्रूनी ह्या तलवारीला अशी धार चढू देत कि ती वज्रासारखी अभंग होऊन अन्यायाचा नाश होऊ दे. असे जर न घडेल तर ह्याच तलवारीने मी माझा अंत करून घेईन."

तिच्या डोळयात मुला-नातवाच्या आठवणीने एकाच वेळी अश्रू दाटून आले आणि अंगार उफाळून आला. तिने ते अश्रू तलवारीच्या पातीनेच पुसले. तत्क्षणी आकाशात वीज कडाडली आणि प्रकाशाची एक रेषा आकाशातून त्या तलवारीत शिरली. पण विजेचे ते रौद्र रूप आणि तांडव थांबले नाही, एका पाठोपाठ एक विजा कडाडत होत्या आणि तलवारीत शिरून नाहीशा होत होत्या. म्हातारी स्वतःच जणू विजेचा एक कल्लोळ बनली.

जोने बघितले, हाच तो क्षण, हीच ती वेळ.

क्षणार्धात मोठ्या आत्मविश्वासाने त्याने ती तांडवकारी तलवार आपल्या हातात घेतली आणि तो तुरुंगाच्या दरवाजाकडे धावला. त्या तलवारीच्या एकाच आघातात तो भला मोठा भयाकारी, भरभक्कम दरवाजा छिन्न भिन्न झाला, त्याच्या चिरफाळया उडाल्या. जोच्या रौद्र रुपाकडे आणि तलवारीचा तडिताघात बघून कोणाची हिम्मत झाली

नाही त्याला अड्वायची. जे आडवे आले, जो दरवाजा त्याला बंद झाला, ज्या कुलुपाने उघडायला नकार दिला, ते ते क्षणात तुकडे होऊन मोडून पडले. तुरुंगाची तिजोरी आणि कैद्यांची अंधार कोठडी त्याच्या तलवारीचा घाव सहन करू शकली नाही. सैनिक तर दूर पळाले. अधिकारी लपून बसले.

जो जणू एक तेजस्वी विनाशक बनून अंधार, अन्याया विरुद्ध रात्रभर हिंडत फिरत होता. आणि त्याच्या पाठीमागून आताच स्वतंत्र झालेल्या तरुणांचे लोंढेच्या लोंढे एखाद्या पुरासारखे घुसत होते, सर्व दूर, सर्वत्र व्यापून उरले होते. तरुण जे न केलेल्या गुन्ह्याच्या शिक्षेची वाट पाहत होते, तरुण जे सैन्यात कधी भरती होणारच नव्हते, तरुण जे विद्रोही बनले होते, तरुण जे प्यादी होऊन मरणार होते, तरुण जे शासनाला आवडत नव्हते, तरुण जे अन्यायाचे आणि दुसऱ्यांच्या अपराधाचे बळी झाले होते. तुरुंगाच्या जन अरण्यात स्वातंत्र्याचा वारा घोंघावू लागला. निळभोर आकाश, चांदण्याचा स्पर्श, वाऱ्याचा आरडा – ओरडा ह्यांनी जादू केली सगळयांवर. आनंदाला उधाण आले.

त्या गर्दीतून वाट काढत शोधत दोन डोळे त्या झोपडीपाशी आले. भावनावेगाने तो म्हातारीच्या पायाशी कोसळलाच. त्या ओळखीच्या स्पर्शाने म्हातारीला पुन्हा रडू आले आनंदाचे. शब्द फुटेना. शत्रूशी लढताना मेला असे सांगितले तो म्हातारीचा मुलगा तुरुंगात तिच्या शेजारीच होता इतके वर्ष आणि आता साक्षात, म्हातारीच्या पायाशी बसून होता. दोघे माय – लेक एकमेकांना आणि बाकीचे त्या दोघांना

डोळे भरून पाहत होते. त्या माय – लेकरांची भेट म्हणजे आनंदाचा मूक सोहळा होता. आता चार डोळे नातवाला शोधायला तयार झाले.

पुन्हा कुठूनसा त्या समूहगायनाचा टिपेचा स्वर जोला ऐकू आला.

आज काही तुफानी घडलय का,

तुम्ही काही तुफानी ऐकलय का.

श्वेता घाबरून त्या आनंद सागराकडे बघत होती. जो गेल्यापासून तिचे चित्त थाऱ्यावर नव्हते. तिचे डोळे सारखे जोला शोधत होते. न राहवून तिने अग्नीफुल हातात घेतले आणि ती एकटक त्याकडे बघू लागली. अग्नीफुल तसेच सुंदर आणि जिवंत दिसत होते. थोड्या वेळाने जो झोपडीपाशी परत आला. त्याच्या हातातील तलवारीचे तांडव काही काळासाठी त्याने जणू म्यान केले होते. तो तिला भेटला. त्याला तिच्या मनातले सारे कळले. दोघे त्या आनंद सागरात सामील झाले आणि तो आनंद सागर आता राजवाड्याकडे निघाला.

********

अशा रीतीने त्या दिवशी गोष्टीने आणि नियतीने घेतलेले ते वेगळे वळण पूर्ण झाले.

जोकोतीनाच्या राज्यात तुमचे स्वागत असो.

**********

# दगड

*(एक निरागस, काल्पनिक चित्रावली (fantasy) तत्वज्ञानाची डूब घेऊन समोर आली आणि मी हरवून गेलो. एका साध्या सरळ घटनेत डोकावताना अचानक आभाळ समोर आले असे वाटले.)*

---

दिपू झोपेत आईला चाचपडत होता. आई हाताला लागली नाही, मग बाबाला चाचपडत शोधू लागला. बाबा ही सापडला नाही, तसा तो सावध झाला. डोळे चोळत चोळत उठला आणि स्वयंपाक घरात येऊन आईला बिलगला. आई ने त्याला उचलून ओट्यावर ठेवले आणि म्हणाली,

"दिपू बेटा, आज रविवार, शाळेला सुट्टी. एवढ्या लवकर कशाला उठलास. जा झोप जा. मी तुला उठवते, 'छोटा भीम' लागला कि हाक मारते. आज खूप काम आहे आईला, बाबांचे मित्र येणार आहेत ना जेवायला. जा."

दिपू भारी मस्तीखोर, चळवळ्या, शांत म्हणून बसेल तर शपथ. एखादी गोष्ट नाही म्हटले तर तीच करणार, तिचाच हट्ट धरणार. हा खण उघड, ते कपाट उघड, त्यातल्या वस्तू बाहेर काढ, त्या उलट सुलट कर, भिंतीवर आदळून आपटून बघ, त्या उंच हवेत उडवून झेलून बघ, आणि शेवटी कोणी ओरडले, कंटाळा आला तर आईच्या पाठीमागे भुणभुण करायची, खायला दे, माझ्याशी खेळ, नाही तर मला तळ्यावर

खेळायला जाऊ दे. आईला सगळे पाठ होते हे. असे सगळे क्रमा क्रमाने घडायची वाट न बघता, दिपू पूर्ण जागा झाला तसे, आईने त्याला दूध, लाडू, खोबऱ्याच्या वड्या दिल्या आणि सांगितले, "दिपू बेटा, तू शहाणा आहेस ना, आज खूप पाहुणे येणार आहेत आपल्याकडे आणि मला खूप काम आहे, तू तळ्यावर खेळायला जा. पण बारा पर्यंत परत यायचे. कचऱ्याची घंटा गाडी येईल, तेंव्हा आपला कचऱ्याचा डबा द्यायला मला सांगायला यायचे. आणि मारामारी करायची नाही. मोठ्या मुलांच्या खेळात लुडबुड करायची नाही, उगाच ब्याट, चेंडू लागेल."

दिपुची स्वारी मोठ्या आनंदात बाहेर पडली. तळे सोसायटी च्या पाठीमागे शिवारातच होते. तळ्याच्या काठी बाग होती, एक कारंजे होते आणि पाण्यात उतरायला पायऱ्या केल्या होत्या.

थोडा वेळ दिपू मातीचा किल्ला करत बसला. त्यात त्याला चित्राची मदत झाली. शेजारची चित्रा एक वर्षाने लहान, पण म्हणून दिपुची कायमची सहायक असे. दोघांचे चांगले जमतही असे. मग कंटाळा आला तसा दिपू म्हणाला आपण दगड टाकू पाण्यात, वानर पुल बांधतात तसा पूल बांधू. मग ते पाण्यात दगड टाकू लागले. पाणी जसे उंच उडे, ते बघून त्यांना मजा येई. असे बरेच दगड धोंडे पाण्यात टाकून झाले. पण पुल काही झाला नाही.

दिपुला आठवले, बाबा किती छान दगड फेकतात, २ - ३ भाकऱ्या पडतात. दीपुच दगड तर बुडून जाऊ लागला. जास्त लांब पण

जाईना. तेंव्हा दिपू सुद्धा चांगला चपटासा दगड शोधू लागला. चित्रा त्याला एक एक दगड आणून दाखवी, दिपू हो म्हणाला कि जमा करून ठेवायची. दोघेही भाकऱ्या पाडायचा प्रयत्न करू लागली. कोण किती भाकऱ्या पाडू शकते. !!!

तळयाच्या काठी पाण्यात पाय बुडवून बसलेले एक गुलमोहोराचे झाड होते. दीपुच दगड जेमतेम त्या झाडापर्यंत जाई. तिथपर्यंत पाणी अगदी उथळ होते. त्याच्या पुढे पाणी खोल होत होत तळयाच्या मध्य भागी २५ - ३० फुट खोल असावे. तळे मोठे - म्हणजे एका football च्या मैदानं एव्हढे मोठे होते. भोवताली उंच, उंच झाडे होती.

दिपुने एक दगड चांगलासा शोधला आणि फेकला. तो नेहमीपेक्षा लांब गेला, पण झाडाच्या अलीकडेच पडला. दोन भाकऱ्या पडल्या. दिपुला आता आणखी उत्साह आला आणि दुसरा दगड त्याने मोठ्या जोमाने, दात ओठ खात, फेकला. तो पहिल्या च्या जरा पुढे गेला आणि झाडाला आपटला. मग दिपुने तिसरा दगड चांगला चपटा, लांबसा निवडला आणि सर्व जोर एकवटून, कमरेत वाकून, जमिनीला समांतर फेकला. त्या मुळे फांद्या आड न येता पाण्यावर दोनदा आपटून तो झाडाच्या पलीकडे बराच पुढे गेला आणि तीन भाकऱ्या पडल्या. दिपूच्या चेहेऱ्यावर विजयाचे हास्य फडफडले, एक क्षणभर. पुढच्याच क्षणाला तो दगड दुप्पट वेगाने पाण्यावरून परावर्तीत झाला, थेट दिपूच्या डोळयांच्या समोर एक वितीवर येऊन हवेत थांबला, दिपुने तर

घाबरून डोळे मिटले. दगड दिपुवर ओरडला, "याद राख, झाडाच्या पलीकडे दगड आला तर गाठ माझ्याशी आहे." दिपुने डोळे किलकिले करून डोळयाच्या कोपऱ्यातून बघितले, तेव्हढे बोलून तो दगड खाली पडला आणि मातीत मिसळून निघून गेला. चित्राला काही दिसले नव्हते, काही कळले नव्हते, ती हसत टाळया वाजवत होती.

तेव्हढ्यात घंटा गाडीची घंटा वाजली आणि दिपू ला घरी जावे लागले. दिपू नंतर, बाबांच्या मित्रांनी आणलेल्या भेट वस्तू आणि खाऊ बघण्यात हरवून गेला आणि ती दगडाची गोष्ट विसरून गेला.

परत रविवारची सुट्टी आली तेंव्हा तो तळयाकडे फिरकला आणि मग एकदमच त्याला त्या दगडाची आठवण झाली. त्यासरशी त्याने ३ - ४ चांगले चपटे दगड शोधले आणि पाण्यात भाकऱ्या पाडायला सुरुवात केली. पहिला दगड झाडापर्यंत गेला, पण बुडाला. दुसरा छान लांब गेला झाडापलीकडे आणि २ भाकऱ्या पडल्या. दगड परत आला नाही. दिपुला बरे वाटले. त्याने तिसरा दगड आणखी जोरात पाण्याजवळून फेकला आणि ३ भाकऱ्या पडल्या. आताही दगड परत आला नाही. दिपुची भीती चेपली आणि त्याने आणखी एक दगड जास्त जोरात फेकला, तो तळयाच्या मध्यभागी जाऊन ४ भाकऱ्या पडल्या. तेव्हड्यात चित्राने हाक मारली म्हणून दिपुने मान वळवून तिच्याकडे बघितले. आणि तो दगड सुसाट वेगात त्यच्या कानाजवळून

सरळ पाठीमागे गेला आणि जोशी काकूंच्या दिवाण खान्याच्या खिडकीची काच खळकन फुटली.

मग भरपूर भांडाभांडी झाली, आईची आणि जोशी काकूंची, दिपुने काच फोडली म्हणून, आई, बाबा त्याच्यावर रागावले. त्याचे म्हणणे कोणालाच पटले नाही. बाबा चिडले आणि दिपुला म्हणाले, खोटे बोलू नकोस, आई कळवळून म्हणाली, दिपू बेटा, खेळताना तुझ्या हातून काच फुटली तर काय झाले, तसे सांग, आणि जरा जपून खेळ, तुला लागले असते तर !!!

दिपू चिडला त्या दगडावर, रडीचा डाव खेळला म्हणून, रागावला बाबांवर, आणि रुसला आईवर, तिने विश्वास नाही ठेवला त्याच्यावर म्हणून. रागात मग तो न जेवताच झोपी गेला. झोपेत असताना कधीतरी अचानक त्याला जाग आली, तो दगड त्याला चिडवत होता, चागली अद्दल घडली, परत टाकशील दगड !!! परत फेकशील दगड !!!

संध्याकाळी आई - बाबा दिपुला Mall मध्ये घेऊन गेले. दिपुसाठी spiderman चा T - Shirt घेतला. दिपू खुशीत घरी आला. रात्री झोपताना आईने हळूच त्याला टोकले, तर दिपू एव्हढेच म्हणाला, आई, तिथे तळयात एक दगड राहतो, तो मला चिडवतो, तळयात दगड टाकायचे नाही म्हणतो. आई त्याला समजावत म्हणाली, दिपू बेटा, तू त्याला सांग, बाबांना नाव सांगीन, ते तुला पकडतील आणि पोलिसात देतील. पण दिपू दमला होता, पटकन झोपून गेला. मग आई ने बाबांना

एकदा दिपू बरोबर तळ्यावर जाऊन कोण मुलगा त्याला त्रास देतो ते बघायला सांगितले.

असाच महिना गेला, दिपू ची परीक्षा संपून सुट्टी लागली. दिपू कडे त्याचा मावसभाऊ राजू आणि बहिण नयना नाशिक हून राहायला आले. ते सगळे आणि शेजारची चित्रा, एकदा खेळायला तळ्यावर गेले. चोर पोलीस, लगोरी असे खेळ खेळून झाले आणि राजू म्हणाला, चला आपण भाकऱ्या पाडू, कोण सर्वात जास्त भाकऱ्या पाडेल त्याला cadbury. राजू, चित्रा, नयना सगळे दगड टाकून भाकऱ्या पडायला लागले. दिपू मनातून थोडा घाबरून काय घडते त्याची वाट पहात थांबला. पण काहीच घडले नाही. आणि ते दिपुला खेळायचा आग्रह करू लागले. म्हणून मग दिपू सामील झाला.

सरावाने दिपुचा दगड लांब जाऊ लागला आणि ३ भाकऱ्या तर हमखास पडायच्या. सगळे दिपू भोवती गोळा होऊन 'मला दाखव तू कसा दगड फेकातोस ते' असे म्हणू लागले, दिपू खुश झाला आणि जरा भाव खाऊन, त्यांना प्रात्यक्षिक दाखवू लागला. ते चढाओढीने तळ्यात दगड फेकून भाकऱ्या पाडू लागले. असा बराच वेळ खेळ खेळून झाला, भुका लागल्या तशा घराची आठवण आली. एक एक जण निघाले. तसे निघण्यापूर्वी एक शेवटचा दगड म्हणून दिपुने मोठ्या जोरात फेकला, ४ भाकऱ्या पडल्या. आणि अगदी दिपूच्या ध्यानी - मनी नसताना, अचानक तो दगड दुप्पट वेगात परत फिरला, दिपूच्या चेहऱ्या समोर

हातभर अंतरावर आला, आणि हवेतच, करकचून brakes लावतात तसा थांबला. कुठूनसा रंगी बेरंगी फुलपाखराचा थवा नाचत, बागडत, दिपुसमोरून उडत गेला. दिपू हरखून त्या रंगांच्या उधळण कडे बघत राहिला. दिपुला वाटले, कदाचित भास झाला, ती फुलपाखरे दचकली, दगडाला म्हणाली, काय रे, किती घाबरवलस न आम्हाला. मग आपले पंख फड्फडवले, पंखावरचे दव बिंदू उडवले आणि उन्हात चमकत ती फुलपाखरे बागेकडे सहलीला निघाली. तेव्हढ्यात तो दगड रागाने दिपुवर ओरडला, फुलराणी मध्ये आली म्हणून वाचलास ह्या वेळेला, नाहीतर नाकावर एक ठोसा दिला असता कळले का !!! मग तो खाली पडला, मातीत मिसळून निघून गेला. दिपुला काही बोलायचा अवसर च मिळाला नाही.

आता दिपू हट्टाला आला, कोण हा मोठा मला दम देतो, म्हणून दुसऱ्या दिवशी दिपू सकाळी बाकीच्या मुलांपासून वेगळा तळ्याकाठच्या कारंज्यापाशी आला. आता तो दगड परत आला कि त्याला पकडायचे आणि बाबांकडे द्यायचे, नाहीतर अडगळीच्या कपाटात drawer मध्ये टाकून द्यायचे, असे ठरवले दिपुने. अगदी तयारीनिशी दिपुने भाकऱ्या पाडायला सुरुवात केली. सगळे दगड टाकून झाले, पण तो परत फिरलाच नाही. त्याला शोधत चित्रा तिथे आली, त्याला पतंग उडवायला बोलवायला आली होती. दिपू तिच्या बरोबर जायला निघाला. जाता जाता तिने पण सहजच एक दगड फेकला, तोही चांगला लांबवर गेला, २ भाकऱ्या पडल्या. तेव्हढ्यात

चित्राचा दगड सु सु करत अचानक दिपू समोर आला आणि एक pause घेऊन त्याने दिपूच्या नाकावर एक फटका मारला. दिपू कळवळला, दिपुने त्याला पकडायचा प्रयत्न केला, पण तो पटकन खाली पडला, आणि मातीत मिसळून निघून गेला. चित्राची पाठ होती, तिला काही दिसले नाही, कळले नाही. दिपू रडत रडत घरी गेला.

ह्या वेळेला मात्र दिपूच्या तक्रारी नंतर आईने बाबांना संध्याकाळी दिपू बरोबर तळयावर पाठवले. दिपुने बाबांना सगळे वर्णन करून सांगितले. पण त्यांचा विश्वासच बसेना. मग बाबा म्हणाले, तू नेहमी प्रमाणे दगड टाक, बघू कोण तुला त्रास देतो ते. म्हणून दिपुने भाकऱ्या पाडायला सुरुवात केली. दिपुला वाटले होते अगदी तसेच झाले, तिसरा दगड परत फिरला. पण बाबांना बघून अर्ध्या वाटेतच हवेत थांबला. एक गिरकी घेतली आणि खाली पडला. तेव्हढ्यात कुठूनसा एक कावळा आला, त्याने त्याला चोचीत पकडले आणि उडून गेला. ते बघून दिपुला खूप मजा आली, बरी खोड मोडली त्या दगडाची, आता बस कावळ्या बरोबर. जा, तो नेईल तिकडे. बाबांना अर्थातच काही कळले नाही, पण दिपू मात्र जाम खुश झाला आणि आठवून, आठवून स्वतःशीच हसला.

त्या सुट्टीत मग परत तळयावर जाऊन खेळायची वेळच आली नाही, दिपू काही दिवस आई बाबा बरोबर नाशिकला राजूकडे गेला, मग ते महाबळेश्वर ला गेले आणि सुट्टी संपताना परत आले. शाळा सुरु

झाली, पावसाळा आला, दिवस पाखरासारखे उडून गेले. गणपती आले. आरत्या, प्रसाद, रोषणाई आणि देखावे ह्यात दिवस पटकन गेले. विसर्जनाची वेळ आली. यंदा तळ्याचे पाणी चांगले भरून वाहत होते. म्हणून गणपती मंडळाने विसर्जनासाठी एक होडी मागवली आणि आत तळ्याच्या मध्ये जाऊन विसर्जन करायचे ठरवले. दिपू बाबांच्या मागे लागला, मला तुमच्या बरोबर होडीत यायचे विसर्जनाला.

तो दगड तिथे तळ्यात परत दिसला तर बाबांना दाखवायचा म्हणजे त्यांची खात्री पटेल, ते त्याला पकडतील, अशी इच्छा होती दिपुची. पण तसे काहीच घडले नाही. दिपू होडीतून सर्वदूर शोधत होता, पण तो दगड काही दिसला नाही. दिपुला वाटले, कावळ्याने बहुतेक त्याला रांजणात टाकून दिले असावे, नाहीतर तो बाबांना घाबरून लपला असावा.

होडीत सगळ्या शेजार पाजारयांचे गणपती विसर्जनाला आणले होते. सगळे एकत्र पूजा करत होते, उदबत्ती, निरांजनाने गणपती ला ओवाळत होते, आरती म्हणत होते, टाळया वाजवून विसर्जनाच्या घोषणा देत होते. आरती झाल्यावर प्रसाद वाटला. दिपुला खिरापत आणि मोदक अतिशय आवडत. दिपू विसर्जनाच्या सोहळयात दगडाला विसरला. विसर्जनाच्या उत्साहात आणि प्रत्येकाचा निरनिराळा प्रसाद खाण्यात दिपुला फार मजा येत होती. मग प्रत्यक्ष विसर्जनाची वेळ आली. म्हणून मग होडी आणखी आत तळ्याच्या

मध्यभागी नेण्यात आली. नावाडी पाण्यात उतरला. नावाडी एक, एक मूर्ती सांभाळून पाण्यात सोडून देई, आणि ते ते यजमान बाप्पाला निरोप देऊ लागले.

सगळ्यांचे लक्ष नावाड्याकडे होते आणि दिपुकडे पाठ होती, ती संधी साधून तो दगड पटकन दिपूच्या समोर आला आणि म्हणाला, मी आलो, मी आलो, मला पकड, मला पकड. दगड जवळ येई, लांब जाई, तशी दिपू त्याला पकडण्यासाठी हात लांब करून झेप घेऊ लागला. त्यांची पकडापकडी सुरु झाली, एक दोन वेळेला अगदी हातात आला, पण ऐन वेळी त्याने पाण्यात बुडी घेतली. दिपू त्या नादात होडीतून हात बाहेर काढून झेप घेत होता. दगड हातातून निसटत होता. एका क्षणी दिपुने त्याला पकडले, पण त्याचा तोल गेला आणि दिपू पाण्यात पडला. अंगाला पाणी लागताच दिपू घाबरला, रडू लागला, बाबांना जोरात हाक मारू लागला. गटांगळ्या खाऊ लागला, नका तोंडात पाणी जाऊ लागले, हात पाय मारून दमला. त्याची शुद्ध हरपली. तेव्हढ्यात एकच गलका झाला, मुलगा पाण्यात पडला, पाण्यात पडला, नावाड्याने दिपुला पहिले आणि क्षणात तिकडे सूर मारला, बाबा आणि त्याच्या मित्रांनी पाण्यात उड्या घेतल्या. दिपुला होडीत ओढून घेतले आणि लगेच घरी निघाले.

भीती आणि दडपणामुळे दिपू आजारी पडला. तापात दिपू काहीबाही बरळत होता. दिपूच्या मनात जी एक अनामिक भीती बसली, ती जायला बराच वेळ लागला. पण तो हळू हळू सावरला.

**********

५ वर्षे झाली त्या घटनेला. आज वार्षिक परीक्षेचा निकाल लागला. दिपुला ९६% गुण मिळून दिपू सर्व शाळेत पहिला आला. दिपू आनंदात होता. जरा पाय मोकळे करण्यासाठी बाहेर पडला, तो नकळत तळ्यावर आला. जुन्या आठवणींनी हुरहूर वाटली. नवीन यशामुळे मनावरचे दडपण, ओझे नाहीसे झाले होते.

दिपुने मनाशी काही ठरवून दगड गोळा केले आणि पाण्यात टाकले. लांब तळ्याच्या मध्यापर्यंत दगड जात होते, ५ - ६ भाकऱ्या पडत होत्या. त्याला समाधान वाटले. तो आता मोठा झाला होता, नाही का !!!

एकही दगड परत आला नाही.

घंटा गाडीची घंटा वाजली तसा तो घरी परत आला. जेवल्यावर दिपुला झोप लागली.

झोपेत असताना कधीतरी अचानक त्याला जाग आली, तो दगड त्याला काहीतरी सांगायचा प्रयत्न करत होता.

"तू जो दगड फेकलास ते तुझे कर्म होते ; आणि जो दगड परत आला ते तुझे नशिब होते. आपले कर्मच आपले नशीब बनून परत येत असते. ही गोष्ट आयुष्यभर लक्षात ठेव. आणि अभिनंदन !!! "

दिपू जागा होऊन अविश्वासाने सगळीकडे बघत राहिला. आजू बाजूला कोणीच नव्हते. पलीकडे एक मोठा खोका ठेवला होता. खोक्यावर मोठ्या सोनेरी अक्षरात लिहिले होते,

'CHOCOLATE ROCKS - FROM ROCKY'.

# सूर्याची चांदणी

*(एका स्त्रीची कहाणी. एक उदास विराणी.)*

---

कड्याखालच्या रानात

गवताने माजलेले शिवार

शिवाराच्या पाठीमागून

रानातून, कड्याच्या पोटात

हरवत जाणारी अंधुक वाट.

तिथे शेवटी एका गडदात — गडद = डोंगर कपार

रानाचा राऊ राखण करतो, — राऊ = देव

भल्या बुरयाची आणि

अनाम प्रचंड श्रद्धेची.

किती बळीनी कितिकांना सुखी केले

तिथल्या त्या गडदात, कितिकांना

राऊने एकांतांत समाधान दिले.

शिवाराच्या मध्यभागी

एकुलती एक झोपडी.
रानातून वेगळी
मनुष्यांची वस्ती.
झोपडीच्या पडवीत
ती एकटी राहते
गच्च कड्याच्या टोकावरल्या
आमराईसारखी.
तिची दिनचर्या ठरलेली
एक वर्ष आधी प्रकाशित केलेल्या कॅलेंडर सारखी.
पहाटेच्या गार वाऱ्यात
गोधडीतला उबेचा एकला शृंगार टाकून
तोल सावरीत सहजपणे
ती तेथल्या राऊकडे जाई.
कड्याच्या तळात जेंव्हा जागरण सुरु होई
प्रकाशाच्या पुलावरून कड्याचा कातळ दरीत झेप घेई,
तेंव्हा ती दमून भागून
अवघड तोल सावरीत झोपडीशी येई.
मग सारे घरकाम,

त्यात ती इकडे तिकडे.
रात्रीचे रंग पडवीत
पहुडायला येत तेंव्हा ती
नुकतीच आचवून, एकलेपणा उशाशी घेऊन,
निजायला गेलेली असे.
वरच्या आमराईत मोहोर येई जाई,
आणि आंबे कधी कधी भुईवर नासून जात,
पण आमराईला त्याचे काही नाही,
ती वर्ष श्राद्धासारखी फुलून झरून जाई.
पण एकदा एक वर्ष एकही आषाढ घन
इकडे नाही आला कड्याच्या टोकाशी विश्रांतीला.
तेंव्हा एक सूर्य राउळात अचानक विसाव्याला होता.
ती अशी भरलेली, विरक्त
कर्तव्यात दंग, उपवासात चूर.
सूर्य तिला भुलला,
रंग देतो म्हणाला,
प्रकाश देतो म्हणाला,
तुझा तू मला हविर्भाग दे.

ह्या वादळाला
एक सानुली वाट दे.
ती तेंव्हा ओठंगून
राऊच्या पायाशी उभी.
राऊने कौल दिला तिला,
हा सूर्य तुझा, हा मान तुझा.
मग सारा शृंगार क्षणार्धात
तिच्या पदरातून सळसळत आमराईत खेळायला आला.
गडदाची पायवाट तिच्या मिठीतून सूर्याशी भिडली.
कड्याचा कोसळ आणि रानवट आवेग
तिच्या चुंबनात सामावला.
तिच्या मनातले मुसळधार शहारे,
जसे दाटलेल्या गवतातून धावणारे वारे,
त्या वाऱ्यांची त्यांच्या मिठीतली आवर्तने.
रानचिमण्यंचा थवा दचकून झुडूपाखालून
अचानक वर आला –
गोफंणीतून सुटलेल्या दगडासारखा.
शृंगार तिच्या वस्त्रविहीन गात्रात ऊतू आला.

स्तनांमधून तटतटला,

ह्रीदयाशी एकरूप झाला.

तो रोकडा शृंगार मांड्यातून झंकारत

सूर्याला नखशिखांत बिलगून बावरला.

निर्मितीच्या आठवाने सूर्य भारावून उचंबळला.

पुरुष आणि प्रकृती एकमेकात विसावले.

मग कविता पूर्णत्वातून संपली.

सूर्य निघून गेला तेंव्हा

ती तृप्तपणे सावलीत बुंध्याला टेकून शांत होती.

करपलेल्या गावात तेंव्हा असंतोष विश्रांत.

असे काय झाले, कशामुळे,

चंद्र आणि कृष्ण - मेघ असे फिके,

गावातले पाप वाढले.

झोपडीत ती एकटी,

तीच कुलटा सडलेली.

तेंव्हा लोक वेडावून म्हणाले

वेश्येला पोर होऊ घातले.

आनंदाच्या डोहात बुडाली ती एका क्षणात

भयाच्या भोवऱ्यात घुसमटली ती एका क्षणात.

रौद्रातून ती ओरडली –

मला तर राऊचा आशीर्वाद होता.

पुन्हा कौल लावला तेंव्हा

राऊ शांतरसात बुडाला होता.

लोकांनी तिला झोपडीसकट जाळले,

पुरुष आणि प्रकृती विलग झाले कायमचे,

पुन्हा कधीही एकत्र न येण्यासाठी.

राऊचा काय हाच कौल होता !!!

साहित्य म्हणजे असतं काय?

जीवनाचे अनुभव असतात, कधी खरे तर कधी खोटे वाटतील इतके खरे.

जीवनमूल्यांचे आदर्श असतात, कधी सोपे, कधी अवघड. कधी अशक्यप्राय.

जगण्याच्या चढ उतारांचे आरसे असतात. कधी अनुभवलेले. कधी न ऐकलेले.

आपल्या मनाचा, आपल्या जीवनाचा आरसा असतो साहित्य.

साहित्यात रमू या.

साहित्यात रमणारा समाज अधिक सुसंस्कृत, अधिक प्रगतीशील असतो.

प्रगती म्हणजे केवळ समृद्धी नाही ना!

ई साहित्य प्रतिष्ठान.

मराठी साहित्यातील एक कोवळे पान.

एक प्रसन्न अनुभव


www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com